मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

मप्र

# हितगुज

अंक ४६ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून २००१

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## सार्वजनिक गणेशोत्सव : कसा नसावा? कसा असावा?

**'एक गाव एक पाणवठा' या चालीवर 'एक गाव एक गणपती' (मोठ्या शहरात गाव ऐवजी विभाग/वॉर्ड) असे धोरण नाही का स्वीकारता येणार? - संपादक**

सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक (आणि छुप्या रीतीने कदाचित राजकीयहि) जनजागृतीसाठी लोकमान्य टिळकांनी शंभर वर्षांपूर्वी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला.

रस्ता गणपतींची सालोसाल वाढती संख्या, वर्गणीरूपी 'खंडणी'चा सर्वसामान्यांना होणारा ताप, कार्यक्रमाच्या नावाखाली दिवस रात्र वाजणाऱ्या 'बोंबल्या'मुळे (म्हणजे Loud Speaker मुळे) होणारे ध्वनिप्रदूषण, गणपतीच्या आराशीमधे प्लॅस्टिक आणि थर्माकोलच्या प्रचंड प्रमाणात होणाऱ्या वापरामुळे पर्यावरणाचे होणारे प्रदूषण, मोठमोठ्या गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी अनेक ठिकाणी आढळणारा जलाशयांचा अभाव तसेच गणेशमूर्तींच्या रंगांतल्या पारा, शिसे, क्रोमियम इ. टॉक्सिक हेवी मेटलमुळे होणारे जलप्रदूषण... अशा असंख्य समस्या आज निर्माण झाल्या आहेत. कदाचित लोकमान्य स्वर्गात कपाळाला हात लावून उद्वेगाने म्हणत असतील - मी काय केले आणि त्याचे आज हे काय झाले!

लवकरच गणेशचतुर्थी अथवा सध्याच्या भाषेत 'गणेश फेस्टिवल' येणार आहे. त्या संदर्भात सप्टेंबर २००० च्या हितगुजमधे केलेल्या आवाहनानुसार **कुलबांधवांनी पाठवलेले विचार** स्वत:चे आणि वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेलेहि - **या अंकांत मनन व मार्गदर्शनासाठी प्रसिद्ध करीत आहो.**

> **पिंगळसईतील १०८ वर्षांची परंपरा**
>
> रोहे तालुक्यातील पिंगळसई या गावातील ८० घरांतील समस्त देशमुखांतर्फे गणपतीची स्थापना कुलस्वामी मंदिरात केली जाते. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केल्यापासून 'एक गाव एक गणपती' ही परंपरा आजतागायत कायम पाळली जात आहे. वर्गणी गोळा करण्यासाठी तरुण मंडळी संपूर्ण गावात फिरतात; मात्र वर्गणी देणे हे कोणावरही बंधनकारक नाही. *(सनातन प्रभात १४ ते २० सप्टेंबर २००० वरून साभार.)*

### वृत्तपत्रातल्या विचारांचे संकलन

१. बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समितीने गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाला अग्रक्रम द्यायचे ठरविले. या दृष्टीने मंडपाची सजावट करताना प्लास्टिक तसेच थर्माकोलचा वापर न करण्याचे आवाहन केले.

२. महानगरपालिका गणेशगौरव स्पर्धेचे आयोजन केले आहे. प्लास्टिक न वापरण्याविषयी जनजागृती, सार्वजनिक स्वच्छता आणि मंडळ राबवीत असलेले सामाजिक उपक्रम हे निकष लावून विजेत्यांची निवड करण्यात येते.

३. गणेशोत्सव देणगीच्या नावाखाली सक्तीने 'खंडणी' गोळा करण्याचा प्रयत्न केल्यास कडक कारवाई होईल असा खणखणीत इशारा गृहमंत्र्यांनी दिला आहे. तसेच सर्व गणेशोत्सव मंडळांनी

*(पुढे पृष्ठ ४ वर)*

**१०वी, १२वी व अन्य परीक्षांतील यशस्वी कुलबांधवांचे मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक अभिनंदन.**

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वा. कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येते. तसेच ४थ्या शनिवारी सायंकाळी ४ वा. गरजेनुसार कार्यकारी मंडळ आणि उपसमित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्यात येते. त्यामुळे उपसमित्या आणि कार्यकारी मंडळ यांचेमध्ये परस्पर संपर्काचे सातत्य रहायला मदत होते. कार्यकारी मंडळाच्या सभेच्या दिवशी सायं. ५ वा. कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत मार्च २४, एप्रिल १४ व मे १२ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. मे १२ रोजी झालेल्या सभेला म. प्र. चे विश्वस्त आनंद यशवंत (पृ.२७७) हेहि उपस्थित होते.

### हितगुज वाटप

वाढत्या किमतीमुळे पोस्टखर्च कमी करावा म्हणून खालील ठिकाणी स्वत: वा स्वखर्चाने अंकवाटपाची जबाबदारी स्थानिक सभासदांनी स्वीकारली असून वर्षभर ही व्यवस्था राबविण्यात आली आहे. -

१. **डोंबिवली** - श्री. अरविंद दामोदर (पृ.२९२), फोन : ४७०६७७
२. **ठाणे** - श्री. आनंद यशवंत (पृ.२७७), फोन : ५३३२२४, ५४२५५२४
३. **मुलुंड** - श्री. लक्ष्मण शंकर (पृ.५२०) फोन : ५६८ ०१०४.
४. **बदलापूर** - श्री. लक्ष्मण शंकर (पृ.५२०) फोन : ६९० ०२६३.

जून २००१ अंकापासून नालासोपारा, वसई, आगाशी, विरार, मीरारोड भागतले अंक वाटण्याची जबाबदारी कुलबांधव **श्री. हेमंत अरुण** (पृ.२१), D२०१, शिवगंगा कॉम्प्लेक्स, वर्तक टॉवरसमोर, तुळींज, नालासोपारा - ४०१ २०९, फोन : (९१२) ४११ १५६ यांनी स्वीकारली आहे. तसेच पुण्यातहि अशा व्यवस्थेबाबत विचार चालू आहे.

**मुंबईच्या इतरहि उपनगरांत ही जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या कुलबांधवांनी संपादकांशी संपर्क साधावा. (फोन : ५६८ ०१०४)**

### कै. सुरेशभाऊस्मृति निधी देणग्या

तिमाहीतील देणग्यांमधे विशेष उल्लेखनीय म्हणून प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि कुलवृत्तांताचे संपादक **विनायक गोपाळ तथा भाऊसाहेब यांनी अमेरिकेतून पाठवलेल्या रु. १७,००० च्या देणगीचा खास उल्लेख** करायला हवा.

१. रमेश रामचंद्र व सौ. नीलांबरी रमेश, (पृ.२८०), पुणे — ५,०००
२. शालिनी जगन्नाथ (पृ.१२०), पुणे — ५,०००
३. शुभदा पांडुरंग जोशी (पृ.७४७) — १,००१
४. यशवंत रघुनाथ (पृ.९१), विलेपार्ले, मुंबई — ५००
५. हेमंत अरुण (पृ.२१), नालासोपारा — ५००
६. सदानंद विष्णु (पृ.४१७), बांद्रा, मुंबई — ५०१
७. श्रीकृष्ण सिद्धेश्वर (पृ.२८), पुणे — ५०१
८. माधव नारायण (पृ.३२९), डोंबिवली — ५००
९. यशवंत लक्ष्मण (पृ.१०१), पुणे — ५००
१०. सीताराम वासुदेव (पृ.२९७), देवळाली, नाशिक — ५००
११. सुधाकर विष्णु (पृ.५८), नागाव, जि. रायगड — २०१
१२. गोविंद नारायण (पृ.५४१), गोवा — १००
१३. विनायक गोपाळ (पृ.६९) USA — १७,०००

---

**ठाण्यात शाही ब्रिज टूर्नामेंट**
**१७ जून २००१**

कै. यशवंत विठ्ठल (पृ.२७७) यांना श्रद्धांजली म्हणून सालाबादप्रमाणे ठाणा ब्रिज असोसिएशनमार्फत **१७ जून २००१** रोजी 'शाही ब्रिज टूर्नामेंट' होणार आहे. ***(पहा : एक आगळी श्रद्धांजली, हितगुज जून २००० - संपादक)***

---

### शिक्षण निधी देणग्या

१. सत्यभामा दामोदर (पृ.२९२), डोंबिवली — १,००१
२. यशवंत रघुनाथ (पृ.९१), विलेपार्ले — ५००
३. सुकृत विनायक खांबेटे (पृ.६९४), विलेपार्ले — २५१
४. गजानन चिंतामण (पृ.१२९), पुणे — १०१

## पुण्यातील हितगुज वितरणाबाबत

आत्तापर्यंत सर्व कुलबांधवांना हितगुजचा अंक पोस्टाने पाठवण्यात येत होता. परंतु यापुढे पोस्टेज खर्च कमी करता यावा व प्रतिष्ठानमधील कुलबांधवांचा संपर्क वाढावा म्हणून शक्य होईल तेवढ्या भागात अंक व्यक्तिगत भेटीने देण्याची योजना आहे.

हितगुजचा अंक मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या ४ महिन्यात १५ ते २० तारखेच्या दरम्यान पुण्यात पोचतो. **यापुढील सप्टेंबरचा अंक पोस्टाने न येता वरील योजनेनुसार मिळेल.** पुण्यातील वर्गणीदारांनी याबाबत अधिक माहितीसाठी **खालील कुलबांधवांशी त्वरित संपर्क साधावा.**

१. **सौ. नीलांबरी रमेश**, व्यंकटेश मर्गदर्शन केंद्र ६४२, नारायण पेठ, प्राथमिक नू. म. वि. शाळेसमोर, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११ ०३०, फोन : ४४५६२७०.
२. **श्री. अरुण दत्तात्रय**, १७५९, सदाशिव पेठ, 'आनंदी', भिकारदास मारुती जवळ, पुणे ४११०३०, फोन : ४४७३२८१.
३. **श्री. अच्युत महादेव चक्रदेव**, २६, शुक्रवार पेठ, भाऊ महाराज बोळ, मायबोली, ग्रंथालयाच्यावर, पुणे ४११ ००२, फोन : ४४८१२८२
४. **श्री. मुकुंद सिताराम**, ५९८-९९, सदाशिव पेठ, मराठे वाडा, कॉमन वेल्थ शेजारी, पुणे ४११ ०३०.
५. **श्री. श्रीराम व्यंकटेश**, २/६ चंद्रलोकनगरी, डहाणूकर कॉलनी, गल्ली क्र. ११, कोथरुड, पुणे ४११ ०२९, फोन : ५४६९२५३.



Marathe Pratishthan

### गुणवत्ता पारितोषिकांसाठी अर्ज

१०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप वा व्यावसायिक स्पर्धा परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ. **अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके दिली जातात.

याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली** पुढील पारितोषिकेहि देण्यात येतात -

१. **कै. कु. अमिता खांबेटे** पारितोषिके -

इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत मराठे परिवारांत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास प्रत्येकी रु. २५०

२. **सौ. सुलभा अनंत** प्रायोजित पारितोषिक (हिंदी) इ. १०वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात मराठे परिवारांत सर्वाधिक गुणांसाठी रु. १००

३. **प्रभाकर गणेश** प्रायोजित पारितोषिक (तांत्रिक विषय) तांत्रिक विषय घेऊन (vocational) १०वी च्या परीक्षेत मराठे परिवारात सर्वाधिक गुणांसाठी - रु. ५००

४. **कै. जगन्नाथ दामोदर** शिष्यवृत्ती ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.) - वार्षिक रु. २०००

तसेच **विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके/बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **अर्ज ३१ ऑगस्ट २००१ पर्यंत प्रतिष्ठानकडे पाठवावे.** याबाबत पुढील सूचना विचारात घ्याव्या.

१. विद्यार्थ्यांनी स्वहस्ताक्षरात प्रतिष्ठानकडे बक्षिसासाठी अर्ज करावा. नातलगांनी त्यांच्या वतीने अर्ज करू नयेत. तरुण वर्गाचा कोणत्यातरी निमित्ताने प्रतिष्ठानशी भेट संपर्क व्हावा हा यामागील मुख्य उद्देश आहे.

२. अर्जात स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे.

३. अर्ज फक्त २०००-०१ या वर्षी झालेल्या परीक्षाबाबत असावे. मागील वर्षाच्या परीक्षेतील यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज विचारात घेतले जात नाहीत.

४. पत्रोत्तर देण्यासाठी अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.

५. विद्यार्थ्यांनी **अर्जासोबत** निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत जोडावी. नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये.

६. खास बक्षिस योजनेखाली (उदा. हिंदी अथवा तांत्रिक विषय) अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.

### शैक्षणिक, वैद्यकीय मदत

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

शैक्षणिक मदतीसाठी तसेच वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

★★★

### खुषीपत्रे

१) कालच मार्चचा हितगुज मिळाला. **'जेथे जातो तेथे'**चा जो आपण कल्पक वापर केलात तो संपादन कौशल्याचा उत्तम नमुना आहे.

- **जनार्दन गोविंद** (पृ.४०५), आगाशी

XXX

२) डिसेंबर २००० अंकांतील **श्रुती करमरकर यांचा चाफा** वाचताना जणु काय चाफ्याचे कलम लावण्यापासूनचे आमचेच अनुभव तिने लिहिले की काय असे वाटले. श्रुतीचा चाफा उत्कृष्ठ वाटला. तिचे अभिनंदन.

- **विठ्ठल महादेव** (पृ.२३५), विश्रामबाग, सांगली.

**स्मरण पूर्वजांचे**

## पहिले विमागणित-तज्ञ

### गणेश सदाशिव मराठे (१८८२-१९४५)

**- वि. गो. कुलकर्णी**

आपल्या जीविताचा, मालमत्तेचा आणि इतरही काही गोष्टींचा आपण विमा उतरवतो. विमा कंपनीला दरमहा किंवा दरसाल हप्ते भरायचे आणि त्या मोबदल्यात आपली इष्टवस्तू नष्ट झाल्यास जेवढ्या रकमेचा विमा उतरवला असेल तेवढी कंपनीने भरपाई द्यायची असा व्यवहार असतो. प्रत्येक गोष्टीत धोका किती हे पाहून हप्ता ठरवावा लागतो. गिऱ्हाईकाला योजना आकर्षक वाटावी आणि विमा कंपनीला एकंदरीत नफा व्हावा, हे यामागचे सूत्र!

**गणेश सदाशिव** (पृ. १७७) हे महाराष्ट्रातले पहिले विमागणिती-ॲक्च्युअरी मराठे म्हणूनच ते ओळखले जात. गणित विषय घेऊन एम. ए. झाल्यावर मराठे यांनी विमागणिती व्हायचे ठरवले. 'इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्च्युअरीज' या लंडनमधील संस्थेच्या पहिल्या दोन परीक्षा कलकत्त्याला उत्तीर्ण होऊन उरलेला अभ्यासक्रम लंडनमध्ये पुरा करून मराठे विमागणिती झाले. त्यांनी महाराष्ट्रात व्यवसायाला प्रारंभ केला. शंभराहून अधिक विमा कंपन्यांचे ते सल्लागार होते. 'महाराष्ट्र विमा संघ' या संस्थेची त्यांनी स्थापना केली आणि विम्याच्या प्रचारासाठी 'भद्रायू' हे मासिक चालविले! त्यांच्या प्रोत्साहनामुळे अनेक तरुणांनी व्यवसायासाठी विमागणित निवडले.

त्यांच्या काळातील अनेक विद्वानांप्रमाणे मराठे एक जाज्वल्य देशभक्त होते. त्यांच्या स्वभावाला जहाल क्रांतिकारक विचार अधिक मानवत. लोकमान्य नॅशनॅलिस्ट युनियनचे ते चिटणीस होते. सावरकरांचे विचार त्यांना पटत. सत्याग्रहात भाग घेऊन त्यांनी दंडही सोसला. पुण्याच्या दामले यांच्या महाराष्ट्र मंडळ, सैनिकीकरण मंडळ अशा संस्थांसाठी त्यांनी कार्य केले. विशेष म्हणजे मराठे यांनी उत्तम विनोदी लेखनही केले. रंगभूमीवरील अनिष्ट प्रथांवर चुरचुरीत टीका करणारे 'नाट्यकलारुक्कुठार' हे पुस्तक आजही चवीने वाचले जाते! ***(साभार: लोकसत्ता, मुंबई, ४.१.२००० - प्रेषक : माधव वासुदेव (पृ. ३८६), पुणे.)*** ★★★



Marathe Pratishthan

*(गणेशोत्सव... पृष्ठ १ वरून)*
नोंदणी करुन घेणे आवश्यक असून नोंदणी न केल्यास कडक दखल घेतली जाईल असेहि त्यांना सांगितले.

४. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या निमित्ताने अनधिकृत मंडळांचा प्रश्न वादग्रस्त बनलेला आहे. मोकळ्या मैदानांची तसेच सार्वजनिक ठिकाणांची वानवा यामुळे रस्ता गणेशांची संख्या झपाट्याने वाढत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आपले स्थानिक राजकारणातील स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करणारी नेतेमंडळी हे यामागचे महत्त्वाचे कारण आहे.

५. गणेशोत्सवाबाबत धार्मिक तसेच सार्वजनिक अशी दोन्ही हत्यारे वापरून त्यातील चुकीच्या बाबीविषयी बोलणाऱ्या सुजाण नागरिकांना गप्प केले जाते.

६. विविध पर्यावरणवादी संस्था/संघटनांनी भक्तगणांना इको-फ्रेन्डली मार्गाने गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. गणपतीच्या मूर्ती प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या बनवलेल्या असतात. त्या पाण्यात विरघळत नाहीत. विसर्जनानंतर हे प्लॅस्टर किनाऱ्यावर येते. तसेच मूर्ती आकर्षक दिसावी म्हणून वापरलेल्या विविध रंगामुळेहि प्रदूषणात भर पडते. लोकांनी धातूच्या मूर्तीचे पूजन करावे. त्यामुळे जमीन आणि पाणी यांचे प्रदूषण थांबू शकेल.

७. गणेशविसर्जनाच्या वेळी बीचवर निर्माल्य कलश ठेवण्यात येणार आहेत. तसेच मांडवांतून निर्माल्य गोळा करण्यासाठी टेम्पो फिरवण्यात येतील. या निर्माल्याचा वापर महापालिकेच्या मुंबईतल्या गार्डन्समधे खत म्हणून करण्यात येईल.

८. एके काळी घराण्याचा गणपती असे. पण आज घरातल्या भावाभावांच्या प्रत्येकाच्या घरांत हौसेचे गणपती आले. मुंबई-पुण्यात तळी, विहिरी यांची संख्या कमी झाली आणि हौसेचे गणपती, खाजगी तसेच सार्वजनिक, वाढतच गेले. त्यामुळे आज मूर्तीच्या विसर्जनाची प्रचंड समस्या मुंबई-पुण्यासारख्या शहरात भेडसावते ही गोष्ट लक्षात घेऊन मूर्ती जास्तीत जास्त लहान आकाराची आणावी. यातून वाचणारी रक्कम खऱ्या गरजूंना, गरीब विद्यार्थ्यांना अगर सेवाभावी संस्थांना देणगी म्हणून द्यावी. ★★★

---

# गणेशोत्सवात राष्ट्र जागृति, धर्म जागृति, राष्ट्रसंघटन यावर भर द्यावा

**- डॉ. पांडुरंग रामचंद्र** (पृ. ५१५), धामसे, गोवा

सार्वजनिक गणेशोत्सवातील गैरप्रकार बंद करण्यासाठी, तसेच या उत्सवातून राष्ट्रजागृति, धर्मजागृति, राष्ट्रसंघटन व पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणाचा प्रतिकार यांसारखी उद्दिष्टे साध्य होण्यासाठी कोणत्या गोष्टी बंद कराव्या व कोणत्या गोष्टी घडवून आणाव्या याची ढोबळमानाने यादी तयार केली आहे.

**गणेशोत्सवात पुढील गोष्टी नसाव्या**

१. मूर्ति फार मोठी नको, मूर्ति चित्रविचित्र वेषात तसेच नारळ, भांडी यांसारख्या गोष्टींपासून बनविलेली नसावी.

२. निधिसंकलनात (वर्गणी गोळा करण्यात) जबरदस्ती नको.

३. मंडप व परिसरात अस्वच्छता, अवास्तव खर्चिक रोषणाई व सजावट तसेच गुटखा, तंबाखु आदि हानिकारक बाबींच्या जाहिराती नको.

४. ध्वनिवर्धकांद्वारे कामुक व अभिरुचिहीन गीते नको. तसेच जुगार व मद्यपान नको.

५. धार्मिक विधी चालू असतांना मंडपात गोंधळ व कर्णकर्कश स्वरात म्हटल्या जाणाऱ्या आरत्या नको.

६. अभिरुचिहीन, देवाशी काडीमात्र संबंध नसलेल्या गीतांचे, रेकॉर्ड डान्स वगैरे कार्यक्रम, हाणामारी व लैंगिकता असणारे चित्रपट तसेच फटाके व दारुकाम नको.

७. मिरवणूक संथगतीने नको. तसेच मिरवणुकीत हिडीस अंगविक्षेप असणारे नाच, मद्यपींचा समावेश, जवळपासच्या मंडळींवर गुलालाची जबरदस्ती, कर्णकर्कश ध्वनिवर्धक नको.

८. इतर मंडळांबरोबर वैरभाव, भांडणे, महिलांशी असभ्य वर्तन, समाजासंबंधी बेफिकिरी, इतरांवर कोणत्याही कारणासाठी जबरदस्ती इत्यादी प्रकार टाळावे.

९. धार्मिक विधींकडे दुर्लक्ष नको. उत्सवाच्या मूळ उद्दिष्टांचे भान ठेवावे. यात समाजाचे संघटन, जागृति व त्याला योग्य राष्ट्रहितकारक वाळण लावणे हे भाग येतात.

१०. मांडवाचे व मंडपाचे खांब पुरण्यासाठी खोदलेले खड्डे बुजवावे. गणेशोत्सवानंतर रस्ते उखडलेले नसावे.

**गणेशोत्सवात पुढील गोष्टी असाव्या.**

१. सार्वजनिक गणेशोत्सवांची संख्या मर्यादित असावी. उदा. शहर : एक वॉर्ड एक गणपती व गाव : एक गाव एक गणपती

२. गणेशोत्सवात गणपति प्रथम व देखावा/सजावट दुय्यम आहे, याचे भान असावे. एकूण खर्चापैकी मोठा वाटा धार्मिक कार्यक्रम, अध्यात्मप्रसार व सामाजिक कार्य यांवर खर्च व्हावा.

३. जास्तीत जास्त लोकांना धार्मिक विधी शांतपणे अनुभवता यावेत.

४. कार्यक्रम - (१) राष्ट्रजागृति व धर्मजागृति या संदर्भातील स्फूर्तिदायक गीते, पोवाडे, सिनेमा, नाटके इत्यादि असावे. (२) राष्ट्रजागृति व राष्ट्रहित या दृष्टिकोनांतून व्याख्याने हवी. उदा. ग्राहकहित, संरक्षण, धर्मजागृति, यासारख्या विषयावरील व्याख्यानासाठी त्या त्या विषयांचा अभ्यास असणाऱ्यांना बोलवावे. (३) समाजातील, पंचक्रोशीतील खरे समाजसेवक, कलाकार, गुणवान विद्यार्थी, उत्तम शौर्य दाखविणारे इत्यादिंचा सत्कार करावा.

५. निधीचा वापर खालील कारणांसाठी व्हावा-



Marathe Pratishthan

# सार्वजनिक गणेशोत्सवांची संख्या मर्यादित असावी.

- **सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ. ६५८) मुद्रे बुद्रुक, कर्जत, (जि. रायगड)

त्यावेळच्या काळाची गरज म्हणून लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. आज मितीस तशी परिस्थिती नसली तरी पण सार्वजनिक गणेशोत्सवाची आणि बहुसंख्य लोक एकत्र जमून जे जे कार्यक्रम सादर करतात किंवा साजरे करतात अशा सर्व सण-उत्सव यांची नितांत आवश्यकता आहे असे मला वाटते. कारण आपण असे पाहातो की आज घराघरात, समाजात माणसे एकमेकांपासून फार वेगाने दुरावत चाललेली आहेत. परिणामी सार्वजनिक सण-समारंभांमध्येसुध्दा त्याचे परिणाम दिसून येऊ लागले आहेत.

आज प्रत्येक गल्लीचा, प्रत्येक आळीचा गणेशोत्सव सुरू झालेला दिसतो. परिणामी सार्वजनिक वर्गणी गोळा करणारी अनेक मंडळे एकाच कुटुंबाकडे वर्गणीसाठी वारंवार येतात. सर्वसामान्य कुटुंबाकडे सर्व मंडळींना वर्गणी देण्याची ऐपत नसली तर प्रसंगी भांडणापर्यंत मजल जाते. अशा भांडणातून कायमचे वैमनस्य निर्माण होते व पुढे ते क्वचितप्रसंगी पिढीजात सुरू राहते. सबब सार्वजनिक गणेशोत्सवांची संख्या खूप प्रमाणात मर्यादित असावी. त्यामुळे मंडळे चांगले सांस्कृतिक कार्यक्रम सादर करू शकतील. अनेक ठिकाणी विभागून जाणारा पैसा एकाच मंडळाकडे आल्यामुळे व अनेक मंडळाना न देता एकाच मंडळास वर्गणी द्यावी लागल्यामुळे कोणतीही तक्रार न करता लोक वर्गणी देतील.

मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये सामंजस्य असणे आवश्यक असते पण क्षुल्लक कारणावरून कार्यकर्ते आपआपसात वैमनस्य निर्माण करून घेतात. त्याचा परिणाम एका व्यक्तीऐवजी पूर्ण उत्सवावर होतो व समारंभातील उत्साह, आनंद नष्ट होऊन जातो. एखाद्या मंडळाने एखाद्या प्रसिध्द व्यक्तीचा कार्यक्रम ठेवला तर कमीतकमी त्या व्यक्तींच्या बरोबरीच्या किंवा ईर्षा म्हणून त्याच्यापेक्षा वरचढ व्यक्तीस कार्यक्रमास आणण्यात येते. आपल्या मंडळाची तेवढी कुवत आहे किंवा नाही हे पाहिले जात नाही. त्यापेक्षा एखादी चांगली प्रशिक्षित व्यक्ती आणून आपल्या आळी किंवा गल्लीतील तरुण मुले-मुली व लहान मुले यांचे कार्यक्रम बसवता आले तर पहावे. त्यासाठी पैसे पण कमी लागतील. आपला मुलगा किंवा मुलगी कार्यक्रमात भाग घेतो आहे या भावनेने त्यांच्या पालकांचे पण सहकार्य मंडळास मिळेल.

मात्र मंडळाच्या जबाबदार कार्यकर्त्यांनी कार्यक्रमात भाग घेणाऱ्या तरुण-तरुणींमध्ये सामंजस्य निर्माण व्हावे यासाठी दक्षता बाळगावी. तसेच त्यांच्या आई-वडिलांना त्यांच्या संरक्षणाबाबत आश्वस्त करावयास पाहिजे. त्यांची पूर्ण जबाबदारी अशा कार्यकर्त्यांनी घ्यावी कारण अशा कार्यक्रमासाठी रात्री अपरात्री कार्यक्रमाच्या तालमीसाठी हजर रहावे लागते. कार्यक्रमात भाग घेणाऱ्या लहान बालकांना रोख रकमेची बक्षिसे अजिबात देऊ नयेत तर ती वस्तुरूपातच असावीत. कारण ज्या कारणासाठी पैसे दिले जातात त्याचा उपयोग काही पालक व्यवस्थित करीत नाहीत. परिणामी अशी मुले पुढील कार्यक्रमात भाग घेत नाहीत. वर उल्लेख केल्याप्रमाणे आवश्यक गोष्टी टाळल्या तर त्यातूनच सार्वजनिक गणेशोत्सव कसा असावा, कसा नसावा ते आपणांस समजेल व लक्षात येईल.

★ ★ ★

---

*(...राष्ट्रसंघटन यावर भर द्यावा - मागील पानावरून)*

(१) जवळपासच्या देवळांची सफाई व डागडुजी. (२) धार्मिक कार्य करणाऱ्या संस्थांना मदत. (३) जवळच्या तीर्थक्षेत्रांना उत्सव साजरे करण्यासाठी मदत. (४) आपद्ग्रस्तांना, शैक्षणिक संस्थांना, राष्ट्रीय कार्याला, गरजू विद्यार्थ्यांना मदत, गरीब रुग्णांना मदत

६. मंडळाच्या कार्यकर्त्यांनी धार्मिक विधी व दैवत यांचा अर्थ समजून सेवा म्हणून उत्सवाचे जागी काम करावे. सार्वजनिक गणेशोत्सव सर्वप्रथम धार्मिक नंतर सामाजिक उत्सव आहे, हे समजून घ्यावे, तो करमणूकप्रधान नाही, हेही समजून घ्यावे.

★ ★ ★

---

# सत्तराव्या वर्षी सायकलने ८० किलोमीटर

- **यशवंत लक्ष्मण** (पृ. १०१), विंग कमांडर (निवृत्त), पुणे.

मी निवृत्तीनंतर सध्या स्वत:चा व्यवसाय करतो. दिवसभर बसावं लागतं. शिवाय मला ४ वर्षापूर्वी हार्ट अॅटॅक येऊन गेला आहे. नियमित व्यायाम आणि समाजभिमुखता या दोन्हीची मला नितांत गरज आहे.

पुणे सायकल प्रतिष्ठान तर्फे दर महिन्याच्या एक तारखेला पर्यावरणाचा ऱ्हास, नैतिक मूल्यांची जोपासना, मानसिक व शारीरिक आरोग्य वगैरे प्रश्नाबद्दल समाजात जागरूकता आणण्यासाठी रॅली असते. गेल्या ४ महिन्यापासून मी रॅलीत भाग घेतो. कामाला सायकल वापरतो. शिवाय आठवड्यात एक दिवस काही प्रतिष्ठान सदस्यांबरोबर पुण्यात साधारण ३०-३५ कि.मी. सायकल सराव करतो. डिसेंबर २००० मधे 'सुरक्षित मातृत्व' करता पुणे-अहमदाबाद सायकल रॅली निघाली. मी या रॅलीत सायकलने पुणे-नारायणगांव हा ८० कि.मी. चा टप्पा केला.

नियमित सायकल चालविण्याचा व्यायाम सुरू केल्यापासून मला दिवसभर उत्साही वाटतं. ज्येष्ठांनी ताठ चालता यावे यासाठी पुरेसा व्यायाम करणे जरूर आहे. हे मला आवर्जून सांगायचे आहे.

★ ★ ★



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**रंगा मराठे यांना रणजित देसाई पुरस्कार**

मेहता पब्लिशिंग हाऊस फौंडेशनतर्फे दरवर्षी 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार दिले जातात. यातला इ.स. २००० साठींचा द्वितीय पुरस्कार (रु. ५,०००) पुण्यातले सभासद **रंगनाथ यशवंत (पृ.३८४) ऊर्फ रंगा मराठे** यांना त्यांच्या 'फॅक्टरी गेट' या पुस्तकाबद्दल अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. विजया राजाध्यक्ष यांच्या हस्ते देण्यात आला. या सन्मानाबद्दल सर्व कुलबांधवांतर्फे हार्दिक अभिनंदन.

**गणित प्रज्ञा परीक्षेत विशेष प्राविण्य**



महाराष्ट्र गणित अध्यापक मंडळाने मार्च २००१ मधे घेतलेल्या राज्यस्तरीय गणित प्रज्ञा स्पर्धा परीक्षेत (इ. ८वी) विशेष प्राविण्य संपादन केल्याबद्दल **सुकृत विनायक खांबेटे** (पृ. ६९४) याला महामंडळातर्फे प्रज्ञापदक व प्रशस्तिपत्रक देण्यात आले. कुमार सुकृत हा पार्ले टिळक विद्यालयात ९वीत शिकत आहे. १०वी च्या आणि पुढील अन्य परीक्षेतहि असेच घसघशीत यश मिळो अशी सर्व कुलबांधवांतर्फे शुभेच्छा.

**बेस्ट इंग्लिश स्पीकर - माणिक चंद्रचूड**



मातृभाषा इंग्रजी नसलेल्या देशांतील किशोरवयीन मुलामुलींसाठी (वय १६ ते २०) 'इंग्लिश स्पीकिंग युनियन' या संस्थेतर्फे मे २००० मधे लंडन येथे झालेल्या **आंतरराष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेत पुण्यातील सभासद बाळकृष्ण रामचंद्र (पृ.४७६) यांची नात (मुलीची मुलगी) माणिक नरसिंह चंद्रचूड** हिला प्रथम पारितोषिक मिळाले. विशेष म्हणजे १२वी चे वर्ष असूनहि माणिकने या स्पर्धेत भाग घेऊन हे यश मिळवले. ही स्पर्धा जिंकण्याचा मान आपल्या देशाला प्रथमच मिळाला आहे. (माणिक १२वी च्या परीक्षेत गुणवत्ता यादीतहि आली होती. गुण ९२.६७% - पहा हितगुज डिसेंबर २०००, पृ.८). माणिकच्या घवघवीत यशाबद्दल सर्व कुलबांधवांतर्फे हार्दिक अभिनंदन.

**नांदा सौख्य भरे**

१. मुलुंड (मुंबई) येथील सभासद **डॉ. अमित यशवंत** (पृ.२९२) **याचा विवाह** वैशाली पांडुरंग पेंडसे हिच्याशी ३ मार्च २००१ रोजी संपन्न झाला.

२. बदलापूर येथील कुलबांधव **अच्युत मनोहर विद्वांस** (पृ.६५९) **यांची कन्या सुमेधा हिचा विवाह** आनंद श्रीकांत जोगदेव यांचेशी पुण्यात ११ मार्च २००१ रोजी संपन्न झाला.

३. मुंबईतील कुलबांधव, म. प्र. च्या कार्यकारी मंडळाचे सदस्य **चिंतामण महादेव** (पृ. २२२) **यांची कन्या नूतन हिचा विवाह** विद्याधर मुकुंद जोशी यांचेशी पुण्यात २० मे २००१ रोजी संपन्न झाला.

४. गोव्यातील सदस्य **सीताराम यशवंत (पृ.५२०) यांचा मुलगा यशवंत (नानू) याचा विवाह** जयश्री गणपती भिडे हिच्याशी २९.५.०१ रोजी मंगेशी, गोवा येथे संपन्न झाला.

**सर्व नवविवाहित वधू-वरास मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.**

**सहवेदना**

१. ठाणे येथील कुलबांधव प्रतिष्ठानचे माजी कार्यकारी मंडळ सदस्य सदाशिव गोपाळ जोशी यांचे बंधु **मधुसूदन गोपाळा जोशी** (पृ.७४१) यांना दि. १५.२.२००१ रोजी देवाज्ञा झाली.

२. ठाणे येथील सभासद प्रतिष्ठानचे विश्वस्त अरविंद दामोदर यांचे काका, **विठ्ठल नारायण** (पृ.२९१) यांचे फेब्रुवारी २००१ रोजी देहावसान झाले. ते ८० वर्षांचे होते.


३. रत्नागिरीतील कुलबांधव **भगवान प्रभाकर** (पृ.४५) यांचे १४.४.२००१ रोजी वयाच्या ८७व्या वर्षी निधन झाले.

४. ठाणे येथील सदस्य **कमलाकर नरहर (पृ.४६) यांच्या पत्नी अरुंधती (जयश्री)** यांचे १८.४.२००१ रोजी प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले. त्या ५० वर्षांच्या होत्या.

**वरील सर्व मृतांच्या कुटुंबीयांच्या दु:खांत मराठे परिवार सहभागी आहे.**

★★★

**गुजरात भूकंपग्रस्तांच्या मदतकार्यातला आमचाहि खारीचा वाटा**


PRIME MINISTER'S NATIONAL RELIEF FUND

0364826

Receipt No. 364826    Dated 12-APR-2001

Received with thanks from MARATHE PRATISHTHAN, MARATHE UDYOG BHAVAN, APPASAHEB MARATHE MARG, PRABHADEVI, MUMBAI-400 025

the sum of Rupees FIVE THOUSAND ONLY

By Draft bearing No. 21075 dt.24-MAR-2001

THE SARSWAT BANK MUMBAI

Rs. 5000.00

Section Officer, Prime Minister's National Relief Fund

(Contributions to Prime Minister's National Relief Fund have been notified for 100% deduction from Taxable Income under Section 80 (G) of Income Tax Act, 1961)

PRIME MINISTER'S OFFICE NEW DELHI

Secretary, Prime Minister's National Relief Fund

Marathe Pratishthan

उद्योग प्रवर्तन :

# पेरा म्हणजे उगवेल

**- विनायक केशव** (पृ. २०) वरळी, मुंबई

माझ्या आईचं अर्ध आयुष्य कोकणातल्या खेड्यात गेलं. पेरणी, लावणी, एवढच काय पण एक दोन वेळा नांगरसुद्धा तिनं हातात धरला होता. मुंबईला तिचं फक्त शरीर वावरत होतं. मनाने ती अखरपर्यंत कोकणातच होती.

कोणतही चांगलं फळ तिच्या हातात आलं की ती बिया काढून कुंडीत रुजवी आणि ते रोप कोकणात घेऊन जाई. ''पेरा म्हणजे उगवेल'' हा तिचा गुरुमंत्रच आम्हाला मिळाला होता.

ज्यावेळी कै. सुरेशभाऊंनी उद्योग-प्रेरणा ही कल्पना विशद केली त्यावेळी मला या गुरुमंत्राची आठवण झाली. प्रेरणा व पेरणे या शब्दांचा अन्योन्यसंबंध मला ज्ञात नाही. पण तो नसला तर आपण जोडला पाहिजे. उद्योग-प्रेरणा उपक्रम आपण राबवतो म्हणजे काय करतो? उद्योगशीलतेचं बियाणं आपण तरुणांच्या मनात पेरतो. पेरणी व्यवस्थित झाली तरच उगवण होणार नाही का?

हे सगळं आठवण्याचं कारण माझ्या नकळत अशी पेरणी झाली. सध्या मी ज्या ठिकाणी काम करतो त्या कारखान्याची तपासणी करण्यासाठी शासकीय अधिकारी माझ्या समोर येऊन बसला. त्याच्या अचानक भेटीमुळे आमची तारांबळ उडाली. संबंधित अधिकाऱ्यांना इंटरकॉमवरून सूचना देण्यात मी गुंतलो होतो. हितगुजचा ताजा अंक पाकिटात कोंबून मी ऑफिसमध्ये आलो होतो. लंच टाईम मध्ये वाचण्यासाठी अंक टेबलावर काढून ठेवला होता. तपासणी अधिकाऱ्याच्या नजरेत तो आला. त्यांनी चटकन उचलून मन लावून वाचण्यास सुरवात केली. त्याने विचारले-

''हे मराठे प्रतिष्ठान काय आहे?''

मी त्याला थोडक्यात समजावून सांगितलं. तो ब्राह्मणेतर होता. म्हणून मला त्याच्या प्रतिक्रियेविषयी उत्सुकता होती.

''काय म्हणता? एक कुटुंब केवळ त्यांचं नियतकालीक चालवतं? अहो, तुम्ही कपिगोत्री मराठे आहात किती?''

''किती? अहो, आमच्या कुलवृत्तांताची पाने ९००हून अधिक आहेत.''

त्यानंतर त्यांनी बरीच माहिती विचारली. विशेषत: उद्योग-प्रेरणा उपक्रमाची. माहिती देण्याएवढं या उपक्रमाचं वयही नव्हतं. नुकताच जन्म झाला होता. त्या अधिकाऱ्यांने माझी परवानगी गृहीत धरून अंक आपल्या ब्रीफकेस मध्ये टाकला.

''अच्छा मराठे साहेब मी येतो.''

''अहो पण तुमची तपासणी?''

''केली ना एवढा वेळ. या तपासणीमध्ये मला बराच माल मिळाला; समजलं?''

त्यानंतर उद्याग-प्रेरणासंबंधी जे काही घडत होतं ते मी त्याच्या कानावर घालत होतो. त्या अधिकाऱ्याची बदली झाली. त्यानंतर कित्येक दिवस तो भेटला नाही.

एकदा अचानक माझ्या ऑफिसमध्ये टपकला.

''हे काय, पुन्हा या सेक्शनमध्ये नेमणूक झाली वाटतं?''

''छे, छे, मी अधिकारी म्हणून नाही आलो. मी एक तुमचा मित्र म्हणून आलोय.''

''वेलकम. काय घेणार? चहा, कॉफी?''

''अहो मी घेण्यासाठी नाही देण्यासाठी आलोय. तुमच्या मराठे प्रतिष्ठानची उद्योग प्रेरणा आम्ही पळवली. आमच्या धाकट्या भावाशी जोडून दिली आणि......''

''आणि काय?''

''त्यांनी एक छोटासा उद्योग - उद्योग बरं कां व्यापार नव्हे - सुरू केला आहे. नोकरीचं खूळ पळून गेलं. आता छान रमलाय उद्योगात. ही घ्या मिठाई गुरुदक्षिणा म्हणून.''

''छे! छे! मी कसला गुरु? गुरु आहे आमचा उपक्रम'' आहे की नाही गंमत? कुठे पेरायला गेलो आणि कुठे उगवण झाली.

★ ★ ★

---

# चोखंदळ, साक्षेपी वाचकाची खुषीपत्रे

*भास्कर नरहर (पृ.४६), रत्नागिरी. हे एक साक्षेपी वाचक. त्यांचे हितगुजबाबतचे अभिप्राय. अशा चोखंदळ वाचकांमुळेच संपादकांना आपल्या श्रमाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळते. - संपादक*

**१**

**'हितगुज' चा (सप्टेंबर २०००) अंक** मी काहीशा घाईगर्दीत असतानाच समोर आला. जाता जाता सहज चार पाने चाळावी म्हणून हातात घेतला व अभावितपणे पूर्ण वाचून झाल्यावरच खाली ठेवला. त्यातील साहित्य-माहिती इतकी उद्‌बोधक - रंजक होती की मला काळावेळाचे भानच राहिले नाही.

''गोड - कडू - आंबट - तुरट''. **सौ. शालिनी चक्रदेव** व ''एका शिक्षिकेच्या द्रष्ट्या आठवणी'' **सौ. सुमती विद्वांस** हे लेख गतायुष्यातील आठवणी चाळविणारे आहेत.

'विशेष गुणवत्ताधारक विद्यार्थी' सदराखालील **गुणवत्ताधारकांचा छायाचित्रांसह उल्लेख इतरांना स्फूर्तिदायक ठरेल.** हसरे हितगुज सदरातील **प्रीता करमरकर यांचा विनोद** खुसखुशीत शंकरपाळ्यासारखा वाटला.

'आरोग्यासाठी आत्मविश्वास' **यशवंत लक्ष्मण यांचा लेख** आम्हा ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शक ठरेल.

**'घर' या रूपकात्मक लेखनातील सर्व पत्रे मोठी गंमतीशीर** असूनही जुन्या-नव्या पिढीतील मानसिकतेचे मनोज्ञ व वास्तव दर्शन घडविणारी आहेत. **विनायक केशव व वसंत**



Marathe Pratishthan

**रावजी** यांची विचारसरणी इतकी मिळतीजुळती असावी हे खरं तर आश्चर्यकारक आहे. यावरून मला असे म्हणावेसे वाटते की मराठे कुलोत्पन्न व्यक्ति कुठेही - कितीही दूर-दूर असल्या तरी त्यांच्या विचारांची नाळ तुटलेली नाही. असो.

**'मन' सौ. विद्या चक्रदेव, एक आगळी श्रद्धांजली** - विचारप्रणालीतील विचारप्रवाह दर्शवितात. तसेच चुटकेवजा चौकटीतील मजकूरही वाचनीय असाच आहे. **Philosophy of Life. Sau. Neelambari Ramesh - उत्कृष्ट** - प्रत्येकाने जीवनात अनुभवावा असा.

**२**

**डिसेंबर २०००चा 'हितगुज' अंक** मिळाला. नेहमीचे प्रघातप्रमाणे एका दमात वाचून बाजूला केला.

**सभासद वृत्त** - आपण मराठे परिवारांपैकी कोणत्याही क्षेत्रांत विशेष प्राविण्य दाखविणारे आबालवृद्धांची माहिती छायाचित्रासह देता त्यामुळे आपलेही नाव हितगुजमधे यावे अशी भावना/ सहजप्रवृत्ती वाचकात निर्माण होते व ध्येयसिद्धीसाठी कार्यप्रवण करण्याचे कार्य अनायासे घडते.

**एकसष्टीचा अंत्यविधी** - कौटुंबिक विसंवादावर विदारक प्रकाश टाकणारी गोष्ट मुले शिकून सवरून दूर परदेशी जातात व वृद्ध आईवडील येथे एकाकी पडतात. भविष्यावर विश्वास असो नसो पण ते तंतोतंत खरे झाल्याचे प्रत्ययास येते. अण्णासाहेबांनी संपत्तीची केलेली वाटणी वस्तुनिष्ठ पण तेवढीच त्यांचे खंबीर मनोवृत्तीचे दर्शन घडविते.

**स्मरण पूर्वजांचे** - आपलेही पूर्वज इतके द्रष्टे होते हे वाचून ऊर अभिमानाने भरून येतो.

**३**

**मार्च २००१ हितगुजबाबत** - प्रतिष्ठानच्या पुणे शाखेने २६ जानेवारी २००१ रोजी वर्धापनदिनी आयोजित कार्यक्रमाचा भर उद्योजक, व्यावसायिकांच्या अनुभवकथनावर होता. त्यांचे भाषणातून, अनुभवातून उद्योग-व्यवसायांत पदार्पण करणाऱ्या, स्थिरावू पाहणाऱ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळावे हा हेतु म्हणजे एक प्रकारे कै. सुरेशभाऊंच्या स्वप्नपूर्तीच्या दृष्टीने टाकलेले उचित पाऊलच होत.

**कर्नल प्रमोदन मराठे** यांच्या लष्करांतील संधी हा इंग्रजी लेख तरुण तरुणींना मार्गदर्शक तसेच त्यांचे व पालकांचे गैरसमज निराकरण करण्यास सहाय्यभूत ठरेल.

विद्यार्थी **कुमार शशांक श्रीधर** याच्या लेखातले विचार युवा पिढीबाबत हताश, निराश झालेल्या आमच्या पिढीला अमावास्येच्या रात्री आकाशात लुकलुकणाऱ्या ताऱ्याच्या प्रकाशाप्रमाणे आश्वासक वाटतील.

निसर्गावर विजय मिळवण्याच्या मानवाच्या प्रयत्नांच्या हतबलतेचे अतिशय मार्मिक शब्दांकन **कविता मयेकरांच्या कवितेत** आहे.

हितगुज मधील सर्वच लिखाण selective तसेच विविध अभिरुचीच्या वाचकाना काही ना काही खाद्य पुरवणारे असते. हे संपादन कौशल्य वाखाणण्याजोगे.

एकच त्रुटी - विवाह सहाय्य मधील २३/२००० मधे जन्मतारीख दिलेली नाही. नजरचूक असू शकेल. ***(होय भास्करराव, नजरचूकच. आपण बरोबर जाणलेत. मात्र डिसेंबर अंकातहि हा मजकूर होता. तेव्हा मात्र ही त्रुटी आपल्याहि नजरेतून निसटलीच! - संपादक)***

★★★

# अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र

प्रेषक - **प्रमोद कृष्ण** (पृ.३७६), ठाणे

प्रिय गुरुजी,
सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात
नसतात सगळीच सत्यनिष्ठ
हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी,
मात्र त्याला हे देखील शिकवा -
जगात प्रत्येक बदमाषागणिक
असतो एक साधुचरित पुरुषोत्तमही.
स्वार्थी राजकारणी असतात जगात
तसे असतात अवघं आयुष्य समर्पित करणारे नेतेही.
असतात टपलेले वैरी
तसे जपणारे मित्रही.

मला माहीत आहे
सगळ्या गोष्टी झटपट नाही शिकवता येत....
तरीही जमलं तर त्याच्या मनावर ठसवा,
घाम गाळून कमावलेला एकच छदाम
आयत्या मिळलेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे.

हार कशी स्वीकारावी ते त्याला शिकवा
आणि शिकवा विजयाचा आनंद संयमानं घ्यायला.

तुमच्यात शक्ति असली तर
त्याला द्वेष मत्सरापासून दूर राहायला शिकवा.
शिकवा त्याला आपला हर्ष संयमानं व्यक्त करायला.
गुंडाना भीत जाऊ नको म्हणावं,
त्यांना नमवणं सर्वात सोपं असतं!

जमेल तेवढं दाखवीत चला त्याला
ग्रंथभांडाराचं अद्भुत वैभव,
मात्र त्याबरोबर,
मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा
सृष्टीचं शाश्वत सौंदर्य अनुभवायला,
पाहू दे त्याला
पक्ष्यांची अस्मानभरारी....
सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर...
आणि हिरव्यागार डोंगर उतारावर
डुलणारी चिमुकली फुलं.

शाळेत त्याला हा धडा मिळू दे -
फसवून मिळवलेल्या यशापेक्षा
सरळ आलेलं अपयश श्रेयस्कर आहे.

आपल्या कल्पना, आपले विचार
यांच्यावर दृढ विश्वास ठेवायला हवा त्यानं,
बेहेत्तर आहे सर्वांनी त्याला चूक ठरवलं तरी.
त्याला सांगा



Marathe Pratishthan

त्यानं भल्यांशी भलाईनं वागावं
आणि टग्यांना अद्दल घडवावी.

माझ्या मुलाला हे पटवता आलं तर पाहा.
जिकडे सरशी तिकडे धावत सुटणाऱ्या
भाऊगर्दीत सामील न होण्याची ताकद
त्यानं कमवायला हवी.

पुढं हेही सांगा त्याला
ऐकावं जनाचं, अगदी सर्वांचं...
पण गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून,
आणि फोलपटं टाकून
निव्वळ सत्व तेवढं स्वीकारावं.

जमलं तर त्याच्या मनावर बिंबवा-
हसत राहावं उरातलं दुःख दाबून
आणि म्हणावं त्याला,
आसू ढाळायची लाज वाटू देऊ नको.

त्याला शिकवा
तुच्छातावाद्यांना तुच्छ मानायला
अन् चाटुगिरीपासून सावध राहायला.

त्याला हे पुरेपुर समजावा की
करावी कमाल कमाई त्याने
ताकद आणि अक्कल विकून...
पण कधीही विक्रय करू नये
हृदयाचा आणि आत्म्याचा!

धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या तर
कानाडोळा करायला शिकवा त्याला
आणि ठसवा त्याच्या मनावर
जे सत्य अणि न्याय्य वाटते
त्याच्यासाठी पाय रोवून लढत राहा
त्याला ममतेनं वागवा पण
लाडावून ठेवू नका.

आगीत तावून सुलाखून निघाल्याशिवाय
लोखंडाचं कणखर पोलाद होत नसतं.
त्याच्या अंगी बाणवा
अधीर धरला पाहिजे धीर त्यानं
जर गाजवायचं असेल शौर्य.

आणखीही एक सांगत राहा त्याला -
आपला दृढ विश्वास पाहिजे आपल्यावर
तरच जडेल उदात्त श्रध्दा मानवजातीवर.

माफ करा गुरुजी! मी फार बोलतो आहे.
खूप काही मागतो आहे...
पण पहा... जमेल तेवढं अवश्य कराच.

माझा मुलगा -
भलताच गोड छोकरा आहे हो तो.

- अब्राहम लिंकन

---

## भूकंपापासूनचा बोध

**- गजानन भास्कर** (पृ.४२७)
घाटकोपर, मुंबई.

गुजरातमधील भूकंपात कित्येक गावांतील घरेदारे, दुकाने, कार्यालये, संस्थांची कार्यालये, आदिंची पडझड झाली. ज्या लोकांच्या मुदत ठेवी, बचत खाती, शेअर्स, विमा गुंतवणूक, बँकांत, पोस्टात, संस्थांमध्ये होती, त्याचे रेकॉर्ड घरे व कार्यालये पडल्यामुळे नष्ट झाले. भूकंपातून वाचलेल्या लोकांचे अशा रीतीने सर्व आर्थिक व्यवहारांचे रेकॉर्ड नष्ट झाल्यामुळे त्यांना अथवा वारसांना पैसे कसे मिळणार हा मोठा प्रश्न आहे.

यावरून बोध घेऊन, प्रत्येकाने मुदत ठेवी, .शेअर्स, बचतपत्रे, विमा, बँकातील खाती, इत्यादि तपशील दाखविणारा तक्ता करावा व त्याची प्रत दूरच्या गावातील आपल्या नातेवाईकाकडे देऊन ठेवावी. त्याचे आधारे भूकंपातून वाचलेल्या लोकांना आपले दावे सिद्ध करणे सुलभ होईल. ही जागरूकता, भूकंप केव्हाही कुठेही होईल, हे पाहता प्रत्येकाने ठेवावी. *(महाराष्ट्र टाईम्स, ६.३.२००१ मधून, साभार)*

## शिर सलामत, तो पगडी पचास!

**- अच्युत धोंडो खांबेटे** (पृ. ६९८), शीव, मुंबई. फोन - ४०२ ३२२०

"शिर सलामत, तो पगडी पचास" ही हिंदी भाषेतील म्हण. पण ती मराठी बांधवांना सुपरिचित आहे. ह्या म्हणीची व्युत्पत्ती काय? तिच्या धाटणीवरून तिचे मूळ रणसंग्रामाशी निगडित भासते. सिंहगडावर उदयभानशी दोन हात करताना शेलारमामांची ढाल हातातून निसटल्यावर डोईचे पागोट्याचा उपयोग करावा लागला तेव्हाचा प्रसंग की, पावनखिंड लढवतांना बाजी प्रभूंशी संबंधित? खरं काय ते फक्त बाबा पुरंदरे, व्यंकटेश माडगूळकर, श्री. विश्वास पाटीलच जाणो!!

मात्र एक बाकी खरे, पगडीच केवळ नव्हे, तर जीवनानंद भोगायचा, तर रूढार्थाने प्रकृती, तब्येत मुख्यत: सुदृढ हवी. "सुख पाहता जवा पाडे, दु:ख पर्वता एवढे" असे जरी संत शिरोमणि तुकाराम महाराजांनी म्हटले तरी हरेक व्यक्ती सुखासाठीच धडपडते!! निसर्ग, चित्रकला, संगीत नाट्य, चित्रपट, क्रीडा, ज्ञानलालसा, इ. जीवनानंद चोहोंकडे भरभरून राहिला आहे. पण आयुष्य क्षणभंगुर!!

मानवाचे आयुष्य सुखसमृध्द व्हावे, म्हणून समाजाच्या सर्व स्तरांतून अव्याहत प्रयत्न चालू आहेत. दैनिक वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, पाक्षिके, त्रैमासिके इ. व्याधी-तज्ज्ञांचे लेख छापीत असतात. नभोवाणी, दूरदर्शन वरून आरोग्य-विशेष कार्यक्रम असतातच. ह्या सर्वांतून मार्गदर्शन कमी पडते की काय म्हणून नाना व्याधींवर वेळोवेळी शिबिरे भरवली जातात ती अलाहिदा. उपचार पध्दती मध्ये ॲलोपॅथी, होमियोपॅथी, आयुर्वेद, नॅचरोपॅथी, योगासने, चुंबक, रेकी व प्राणायाम इत्यादींचा समावेश असतो. कोणाला कशाने गुण येईल काय सांगावे? ज्याला जे मानवेल, परवडेल ते तो अंगिकारतो. कोणी, एका रुद्राक्षाला पंचवीस रुपये मोजून गळ्यांत अडकवितो तर कोणी रुपये दहा देऊन तांब्याची पाटली मनगटावर चढवतो! दोघेहि बी.पी. कमी झाल्याची साक्ष देतात!!

माझ्याबरोबरच सेवा निवृत्त झालेले चिंतोपंत उकिडवे. बऱ्याच दिवसात गाठभेट झाली नाही. म्हणून चौकशीला त्यांच्याकडे गेलो. घरी नव्हते. सौ. वहिनींकडे विचारणा केली असता कळले की, चिंतोपंत योगासन-शिक्षक श्री.



Marathe Pratishthan

निंबाळकरांकडे माहीमला आसने शिकायला रोज सकाळी जातात. फावल्या वेळात रोज घरी प्रात्याक्षिके!! ''नसता वैताग आणलाय हो भावोजी'' असे म्हणून तक्रार गुदरली, ''अहो मी कामांत, स्वयंपाकघरात बेल वाजती तर हातातलं टाकून मी दार उघडायचे. ह्यांच्या तंगड्या शीर्षासनांत वरती किंवा शवासनांत खालती!! नाक धरुन, प्राणायामांत शून्याकडे दृष्टी!! कोणी आलं गेलं तरी विचारपूस मीच करायची!!!''

गीताव्रती श्री. बाळासाहेब साठे यांना म्हणे मोड आलेलं कडधान्य कच्चच खाण्याचा छंद. त्यामुळे जीवनसत्त्वे सर्व शिजताना फुकट न जाता त्यांच्याच जठराग्नींत जातात. पण हे सर्व करूनही, ''गीतादर्शन'' मासिकांतून ते लवकरच निवर्तल्याचे कळले! मला मात्र उगीचच समर्थांच्या मनाच्या श्लोकांतील खालील चरण आठवले. ''तनू रक्षिण्या कारणे यत्न केला, परी शेवटी काळ घेवोनि गेला.''

उडीद वा गव्हाची रोपं घरातच वाढवून ती नियमाने खाणारी माणसही ऐकिवात आहेत. तात्पर्य, शरीर स्वास्थ्यासाठी जे जे म्हणून शक्य आहे ते ते सर्व करून पाहणारी मंडळी आहे. पण, आरंभ शूर: खलु दाक्षिणात्यांचीच खोगीर भरती! कुठल्याही प्रयत्नांत समर्थांनी उपदेशिलेले सातत्य अभावानेच प्रत्ययास येते!

स्वातंत्र्योत्तर काळात पुरस्कारांचे पेव फुटलेय! नाना आणि नको नको त्या विषयांत विक्रम नोंदवून गिनीज बुकांत झळकण्याची पराकाष्ठा चालू आहे. ''हे करून पहा'', ''घरगुती औषधे'' इत्यादी शीर्षकाखाली पुष्कळ दैनिकांतून लवंग, वेलची, तमालपत्र, दालचिनी, चुना वा त्याची निवळी, आले, आवळा, जायफळ, मायफळ, वेखंड, रक्तचंदन, ज्येष्ठमध, मध, कंकोळ, हिरडा इत्यादी इत्यादींचे गुणगान वर्णिलेले असते. मला वाटतं ही माहिती वाचून कोणी उपचार केल्याचे ऐकिवात नाही. वृत्तपत्रांत, मासिकांत वा अन्यत्र केवळ रकाने भरण्याचेच काम उपरोक्त औषधे करीत असतात, अन्यथा औषधांची दुकाने ओस पडतील.

एका सायं दैनिकात, ''कान दुखत असल्यास टाटोल्याचा रस काढून चार थेंब कानांत टाकल्याने, कान दुखण्याचा थांबतो'', असे वाचले. आता असं पहा हल्लीच्या विंग्रजी माध्यम शिक्षणात, बोंबलायला टाटोळा म्हणजे काय हे शहरी माणसांना कसे माहिति असणार? हल्ली ''घोटाळा'' हा सर्वांना सपरिचित, टाटोळा म्हणजे काय, हे वसईला गेल्या शिवाय मुंबईकराला कळणार नाही!!

सद्य स्थितीची जाण आजकाल आयुर्वेदीय औषध कंपन्यांना झालेली दिसतेय. त्यांनीही अलिकडे आरोग्यवर्धिनी, शंखवटी, बोंबवटी नांवाच्या टॅब्लेटस् काढल्या आहेत. अहो, घ्यायला सोप्या. तोंडात टाकायच्या अन् वर घोटभर पाणी की मामला खलास. हल्ली लोकांना हलकं, फुलकं नि सोपं हवं, स्थूलपणा घालवायला म्हणे दोरीवरच्या उड्या उत्तम. पण समजा ते जमत नसेल तर भल्या पहाटे ७ वाजता उठून, नट्टापट्टा करुन प्रभात फेरी - चुकलो मॉर्निंग वॉकला जावे. स्वत:च्या घरातला केर-वारा, पोछा, धुणी-भांडी करणे हा स्त्री मुक्ती चळवळीला गळफास.

हसरे हितगुज

### अपघाताची वेळ

धरणांची कामे आडबाजूला असतात. तरुण डॉक्टर अशा जागी यायला तयार नसतात. एखादा रिटायर्ड डॉक्टरच आमच्या नशिबी असतो. राहुरीजवळ मुळा धरणाचे काम चालू होते. एकदा तिथे अपघात झाला. जखमी कामगाराला दवाखान्यात आणून इतर कर्मचारी डॉक्टरना बोलवायला गेले. डोळे चोळत डॉक्टरनी दार उघडले. जखमीला दवाखान्यात आणले आहे, तुम्हाला बोलावले आहे असे सांगताच ते म्हणाले ''अपघात झाला काय? किती वाजलेत आता?'' ''बारा वाजले!'' जखमीच्या सहकाऱ्याचे उत्तर. ''बारा वाजलेत? ही काय अपघाताची वेळ झाली काय? सकाळी या म्हणावं!'' असे म्हणून डॉक्टरांनी दरवाजा लावून घेतला.

कर्मचारी कपाळाला हात लावून माझ्याकडे आले. मी जवळच रहात होतो. मी स्वत: जाऊन डॉक्टरना उठवले आणि दवाखान्यात घेऊन गेलो.

**- विठ्ठल महादेव** (पृ. २३५), निवृत्त कार्यकारी अभियंता, विश्राम बाग, सांगली.

चार चौघी जसं वागतील तसंच वागावं लागतं. प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा धोका कोण पत्करणार? शिवाय सोसायटीत आपल्या नावाची चर्चा नको! ''मी लोक-निंदेला भीत नाही'' असं जरी वरकरणी मनुष्य बोलत असला तरी इतरे जनांच्या दृष्टींतून मी चांगला कसा ठरेन यासाठी प्रत्येक व्यक्ती हरघडी खटपटीत असते, हेही तितकेच खरे!!

असंख्य व्याधी, त्यावर नानाविध उपचार पध्दतीची अगणित औषधे उपलब्ध असतात. साधा, पाणी पिण्यापासून शिवांबू प्राशन विधी, कडू कार्ल्याचा रसापासून तो मेथीच्या लाडवांपर्यंत, कडूनिंबापासून तो तहत दुर्वांच्या रसापर्यंत, एक ना दोन अशा शेकडो तऱ्हा लोकं अनुभवताहेत!! एक मान्य केलेच पाहिजे की, अलिकडे मृत्यूची टक्केवारी घटलेली आहे. सारख्या षष्ठ्यब्दपूर्त्या, अमृतमहोत्सव, शताब्द्या कानावर येतात. या सर्व जल्लोशांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वा विज्ञानाचा वाटा निश्चितच लक्षणीय आहे.

''लाईफ इज ॲक्सिडंट ॲण्ड डेथ इज नॅचरल'' हे वास्तव विधान सर्वांस ज्ञात असले तरी जगण्यासाठी मनुष्य मात्र आपली सर्व बुध्दी पणास लावतो. त्यात गैर काहीच नाही. नुसतं वर्षात न जगता काहीतरी कार्यात जगावे. (वन शुड लिव्ह इन डीड्स ॲण्ड नॉट इन ईयर्स) वृध्दापकाळात हातून कार्य काय घडणार? हीच चिंता असेल तर ''नाम फुकाचे फुकाचे - देवा पंढरीरायाचे'' हे आठवून, आपणच आपल्या आत्म्याचा उध्दार केला पाहिजे. उध्दरेदात्मनात्मानम् ....... (गीता ६.५)

भगवान श्रीकृष्णाने गीतेत उपदेशिल्यानुसार ''न जायते म्रियते, वा कदाचित...... न हन्यते हन्यमाने शरीरे।'' हे लक्षात ठेवावे. आपण सारे पुनर्जन्म मानतो. 'आय ॲम एटी एट' असे इंग्रजीत सांगून नुसती ऐटी मिरवू नये. आपल्या दीर्घायुष्यात दैवाचा भाग असतोच. कित्येकांना कौटुंबिक समस्यां वा विवंचना असतात, ''सजीवं दहते चिंता'' या न्यायाने जाळीत असतात! ''सामर्थ्य आहे चळवळीचे'' हे खरे असले तरी ''तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे'' याचा विसर पडून चालणार नाही. दीर्घायुषींच्या विविध खटपटीत हे अधिष्ठान अत्यावश्यक आणि सहजसाध्य आहे.

★★★



Marathe Pratishthan

# आयकर दात्यानो सावधान

- गजानन चिंतामण (पृ. १२९), पुणे

***जून महिना हा Income Tax Returns दाखल करायचा महिना. या दृष्टीने कुलबांधवांना हा लेख खचितच उपयुक्त वाटेल. - संपादक***

मराठे प्रतिष्ठानच्या वर्धापनदिनी पुणे येथे २००० साली मी पगारदार नोकरासंबंधी व २००१ साली छोट्या व्यावसायिकाच्या संबंधी आयकराची माहिती दिली. मी २६ जानेवारीच्या भाषणांत छोट्या उद्योगधंद्याबाबतची आयकरासंबंधीची माहिती सांगताना आपणास बजेटमधे २००१ च्या आयकरासंबंधी काय फेरबदल होणार आहेत ते मी लेखाद्वारे मांडणार आहे असे म्हटले होते. त्यानुसार मी आपणास नवीन बजेट बाबत काय बदल झाले ते देत आहे.

माननीय अर्थमंत्री श्री. भगवंत सिन्हा यांनी २८ फेब्रुवारीस बजेट सादर केले त्यानुसार खालील बदल झाले आहेत.

१) २६ जानेवारीस भूकंप गुजराथ येथे झाला त्यामुळे गुजराथी बांधवांना मदतीकरता सरचार्ज दरात २% वाढ केली. त्यानुसार जुना सरचार्ज १०+२=१२ व १,५०,००० वर उत्पन्न असणाऱ्यांना १५+२=१७ अशी वाढ फक्त ३१ मार्च २००१ पर्यंत केली.

२) नवीन बजेट मधे सरचार्ज फक्त २% ठेवला.

३) पंतप्रधान निधीत गुजराथ करता जी देणगी दिली जाईल ती 80 G या कलमानुसार १००% करमुक्त असेल.

३A) ५० ते ६० हजार पर्यंतच्या उत्पन्नावर फक्त १०% आयकर द्यावा लागेल. त्यांना सरचार्ज देण्याची आवश्यकता नाही.

४) सहकारी सोसायट्यांना करांत ५% सूट मिळाली. (३५% वरून ३०%)

४A) पगारदारांना LTC सुविधा २ वर्ष रद्द.

५) यापुढे पगाराच्या उत्पन्नात perquisites चा विचार करताना फक्त घर व गाडी वगळता फक्त किंमतीचा विचार केला जाईल.

६) १,००,००० च्या आत उत्पन्न असणाऱ्या पगारदार व्यक्तीचा ८८ च्या Rebate मधे १०% वाढ (२०% वरुन ३०%) दिली जाईल.

७) 80 L मधे (Interest, Dividend) या कारणाकरता पूर्वी रु. १५,००० पर्यंत सुट मिळत होती. आता एकूण फक्त रु. १२,००० सुट मिळेल.

८) या पुढे sale of securities व units यामुळे होणारा फायदा जर Primary issues of shares of Public Companies मधे गुंतवणुक केल्यास Long Term Capital Gain Tax होणार नाही.

९) या पुढे घराचे (नवीन) जे पूर्वी स्वत:च्या घराच्या housing loan करता पूर्वी १,००,००० सूट मिळत होती. आता त्यामध्ये ५०,००० वाढ झाली आहे. नवीन सूट रु. १,५०,००० मिळेल.

१०) घरापासून मिळणाऱ्या उत्पन्नात पूर्वी जी घर दुरुस्त करता Annual value च्या २५% सूट मिळत होती त्यामधे ५% वाढ झाली असून आता यापुढे ३०% सूट मिळेल.

११) पूर्वी १९९१ साली १/६ ची scheme अस्तित्त्वात आली व त्यानुसार ज्याच्याकडे स्वत:ची गाडी, टेलिफोन, परदेशी प्रवास, रहाण्याचे निवासक्षेत्र, Credit Card Holder व कोणत्याही Club Member ज्याची वर्गणी रु. २५,००० आहे त्यांना आयकर पत्रक भरणे. फॉर्म २८ मधे भरणे अत्यावश्यक केले आहे. आता यापुढे छोट्या गावांना ही स्कीम लागू केली जाईल.

१२) या पुढे सर्व कंपन्यांना जरी loss झाला तरी आयकर पत्रक भरणे सक्तीचे केले आहे.

१३) या पुढे लॉटरी, पासूनचे उत्पन्न, बक्षीसाचे उत्पन्न यावर फक्त ३०% कर आकारणी केली जाईल.

१४) कौन बनेगा करोडपती या सारखे T.V. वरच्या स्पर्धावर ३०% आयकर द्यावा लागेल.

१५) या पुढे Fix Deposit मधे ठेवलेल्या रकमेवर जर त्यांचे वार्षिक मिळणारे व्याज रु. ५,००० असेल तर १०% दराने TDS कापला जाईल.

१६) या पुढे Refunds, reassessment and reopening of assessments यांच्या कालावधीत घट केली जाईल.

१७) या पुढे Transfer of immovable property करता इनक्मटॅक्स कडून 230 A Certificate लागत असे. आता अशा व्यवहारांना लागणार नाही.

१८) या पुढे Fixed Amount of Penalty Leviable ची तरतूद केली असून त्यानुसार Fix Amount Penalty म्हणून आकारली जाईल.

१९) इनकमटॅक्सच्या दरात कोणताही बदल झाला नसून पूर्वीच्या दराने कर आकारणी केली जाईल.

वैयक्तिक उत्पन्नाचे दर पुढीलप्रमाणे :-

१) ५०,००० पर्यंतच्या उत्पन्नावर कर नाही.

२) ५०,००० व ६०,००० पर्यंतच्या उत्पन्नावर १० कर आकारणी (रु. १०००) सरचार्ज नाही.

३) ६०,००१ ते १,५०,००० रु. १००० +२०% ६०,००० वरील उत्पन्नाचा + २% सरचार्ज.

४) १,५०,००० वरील उत्पन्नावर रु. १९,००० + ३०% १,५०,००० वरील उत्पन्न + २% सरचार्ज.

२०) मी छोट्या व्यावसायिकांनी उद्योगधंद्यात शिरताना आयकरासंबंधी काय काळजी घ्यावयाची आहे याचे भाषणात सांगितले आहेच परंतु जर आपल्या घरावर Income Tax Office ची धाड पडली किंवा आपल्या व्यवसायाच्या संदर्भात Survey Party आल्या तर न घाबरता आयकर अधिकाऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तरे द्यावी व त्या उत्तराची एक प्रत स्वत:जवळ ठेवावी.

आपणास आयकर पत्रक भरण्यात अडचण आली तर घर नं. ३४ अ सार्थक, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११ ०३०. फोन : ४३३ १६५१ येथे संपर्क साधावा. ★★★



Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

*हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती 'विवाह सहाय्य' या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी.*

*बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार. त्यामुळे कपिगोत्र नसणाऱ्या मुलां-मुलींची माहिती पाठविण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.*

*कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. - संपादक.*

**क्र. १/२००१ वधू** कु. पल्लवी रघुनाथ फाटक, गोत्र - कौशीक, कोकणस्थ ब्राह्मण, जन्म - २८-१-१९७८, रंग - गोरा, सडपातळ, उंची - ५' ३'', चष्मा नाही, शिक्षण - एम्. एस्सी. पुणे विद्यापीठ २००० (वनस्पती शास्त्र) NIIT मधून C व C चा कोर्स चालू आहे. मुलीला आई, वडील आहेत. आई : शालेय शिकवण्या व घरकाम. वडील : CWPRS खडकवासला या संशोधन शाळेत काम करतात. थोरला भाऊ : B.E. (E & TC) नोकरी करतो. विवाह होणे आहे. **अपेक्षा** - इंजिनिअर, डॉक्टर, CA चालेल. **संपर्क** - श्री. रघुनाथ दिनकर फाटक, अे/१ किर्ती नगर नं. १, वडगाव बुद्रुक, पुणे ४११ ०४१. (फोन - ४३५ १६५०.)

**क्र. २/२००१ वधू** नीता बळवंत पेठे, जन्म १८.६.१९७८, उंची - ४'-११'', बी.कॉम व कॉम्प्युटर कोर्स D.C.A., A.D.C.P., DTP चालू. आई शिक्षिका, वडील खाजगी कंपनीत नोकरी, दोन भाऊ विद्यार्थी, **अपेक्षा** - अनुरूप. **संपर्क** - बळवंत लक्ष्मण पेठे, 'समाधान', मणियासा सोसायटीजवळ, मणिनगर (पूर्व), अहमदाबाद - ३८० ००८. दूरध्वनी - २७४००७६. (म. प्र. चे सभासद प्रकाश गणेश विद्वांस पृ.६५४, यांची भाची)

**क्र. ३/२००१ वर** मनीष काशिनाथ दातार, कोकणस्थ, गौत्र शांडिल्य, जन्म - ५.१२.१९७४, उंची - ५'-८'', DCE, बिल्डर, स्वत:च्या फर्मस्, (मा. प्रा. २०,०००,) जबलपूर येथे स्थायिक, वडील सेवानिवृत्त आर्किटेक्ट, नातेवाईक पुणे व सांगली येथे. **संपर्क** - के. बी. दातार, ७५६ आर्चिडेन, विजयनगर, जबलपूर (म.प्र.) ४८२००२. फोन - ६४२०५७. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, याचेकडून)

**क्र. ४/२००१ वर** गजानन ऊर्फ हेमंत भगवान आपटे, कोकणस्थ, जन्म - २८.१२.१९७२, ५'-२'', बी.कॉम. फॅब्रिकेशन, मा. प्रा. ६ ते ७ हजार पंढरपूर येथे घर व शेती. आई, वडील, एक बहीण अविवाहित. **अपेक्षा** - अनुरुप. **संपर्क** - अ. रा. आपटे, आपटे वाडा, घ. नं. ३३५६, चंद्रभागा घाटाजवळ, पंढरपूर - ४१३३०६. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ५/२००१ वर** सुमेध दिनकर जोशी, कोकणस्थ, शांडिल्य गोत्र, जन्म - ७.८.१९६८, उंची - ५'-६'', १०वी पास, पौरोहित्य व बागायत, आई-वडील, एक अविवाहित बहीण, ५ विवाहित बहिणी, **संपर्क** - दिनकर गोपाळ जोशी, देऊळवाडा, मालवण - ४१६६०६. (जि. सिंधुदुर्ग), फोन : ०२३६५-५२९९३ (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून

**क्र. ६/२००१ वर** सुधीर दत्तात्रय जोशी, कोकणस्थ, गोत्र - शांडिल्य, गोरा, २३.३.१९६४, उंची ५'-६'', बी.कॉम, बँक ऑफ इंडिया, रोहा येथे नोकरी, मालवण येथे घर, २ भाऊ विवाहित, ३ बहिणी विवाहित, आई-वडील नाहीत, **संपर्क** - वसंत दत्तात्रय जोशी, २/१० आर्यकृष्ण अपार्टमेंट, कुळगांव (बदलापूर) ४२१५०३. फोन - ०२५१-६९४३०८. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ७/२००१ वर** अमित भालचंद्र जोशी, कोकणस्थ, गोत्र-शांडिल्य, जन्म - २०.१.१९७२, उंची ५'-८ १/२'', डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनियरिंग, बजाज टेंपो मधे कायम नोकरी (रु. ६,००० पगार) सुभाषनगर येथे बंगला, आई-वडील, एक भाऊ घटस्फोटित, **अपेक्षा** - अनुरूप, पुण्यात नोकरीस प्राधान्य, **संपर्क** - भालचंद्र जोशी, तथास्तु जलाराम मंदिराजवळ, सुभाषनगर, मिरज (जि. सांगली) ४१६४१० फोन : ०२३३/२६७५३८. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ८/२००१ वर** सुबोध सुरेश ओगले, कोकणस्थ, गोरा, गोत्र-काश्यप, जन्म - ११.१०.१९७२, उंची ५'-६'', I.T.I. ड्राफ्टस्मन, (मा.प्रा. रु. ७,०००) घर, प्लॉट, स्वत:चा दुकानगाळा, **संपर्क** - सौ. लता सुरेश ओगले, द्वारा एम्. एन्. पवार, फ्लॅट नं. ५, शांती क्लिनिक मागे, सांगली, फोन : ३२५३३२. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचेकडून)

**क्र. ९/२००१ वर** विवेक श्रीकृष्ण कुळकर्णी, देशस्थ, जन्म - २८.७.१९७१, उंची ५'९'', M.E. Production, किर्लोस्कर कमिन्समधे नोकरी, **संपर्क** - श्रीकृष्ण उद्धव कुलकर्णी, ४५, पंचवटी, संयुक्त महाराष्ट्र सोसायटी, राजाराम पुरी, कोल्हापूर ४१६ ००८ फोन : ०२३१-५२१२४७. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली, यांचे मार्फत)

**क्र. १०/२००१ वर** मिलिंद मुरलीधर जोशी, देशस्थ, गोत्र-भारद्वाज, जन्म - ९.१२.१९७३, उंची ५'-८'', B.E. (Elec. & Tele.) सांगली येथे सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून कायम नोकरी, (मा.प्रा. रु. ७,०००), आई-वडील, एक बहीण विवाहित), **संपर्क** - मु. गो. जोशी, 'सावली', वारणाली रोड, विश्रामबाग, सांगली - ४१६४१५. फोन : ३०५३८६.(म.प्र. वधूवर माहिती केंद्र, यांचे मार्फत)

**क्र. ११/२००१ वर** शाम ऊर्फ दीपक विनायक देशपांडे, देशस्थ, जन्म - २५.६.१९७०, उंची ५'-५'', M.A., नोकरी व सिमेंट एजन्सी, (मा.प्रा. रु. ८,५००) उत्तम आर्थिक परिस्थिती, स्वत:ची दोन घरे,



Marathe Pratishthan

वडील निवृत्त, आई इन्कम टॅक्स इन्स्पेक्टर, **संपर्क -** वि. रा. देशपांडे, ७२२/३ए, व्यंकटेश अपार्टमेंट, जुना वाशी नाका, कोल्हापूर. फोन : ६२६९७४. (म.प्र. वधूवर माहिती केंद्र, सांगली यांचे मार्फत)

**क्र. १२/२००१ वर** भाग्येश माधव जोशी, कोकणस्थ, गोत्र-शांडिल्य, जन्म - २५.१२.१९७३, उंची ५'-५ १/२'', बी.कॉम, पीजीडीबीए, मा.प्रा. १०,०००, आई-वडील - दोघेहि सेवा निवृत्त, बहीण १ विवाहित. **अपेक्षा -** कुठल्याहि ब्राह्मण शाखेची गोरी तरतरीत सुदृढ, किमान ५'-३'', पदवीधर (वाणिज्य शाखेची अधिक चांगली), नोकरी असल्यास हवी, नसल्यास करण्याची तयारी हवी, मनमिळावू सडपातळ, एकत्र राहण्याची तयारी हवी, **संपर्क** - सौ. विद्या माधव जोशी (पृ.४२७ - कृष्ण सखाराम यांची मुलगी), प्लॉट न. ४६, मंगलमूर्ती को. हौ. सोसायटी, पाठारे पार्कजवळ, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१. फोन : ०२५१-६८८७२१.

**क्र. १३/२००१ वर** अमोल अरविंद परांजपे, कोकणस्थ, गोत्र-विष्णुवृद्ध, जन्म - १२.७.१९७४, उंची ५'-५'', बी.ई., एम्.बी.ए., इंडालमधे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, पगार रु. १३,०००, आई नाही, वडील व १ अविवाहित बहीण, **अपेक्षा -** कोकणस्थ, वाणिज्य पदवीधर, कॉम्प्युटर लिटरेट, पत्रिका पाहणे आहे, उंची अनुरूप, नोकरी हवीच असे नाही, **संपर्क** - अरविंद हरी परांजपे, ए ब्लॉक, ११ ए, नारायणदत्त निवास, डी. एल. वैद्य रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ००८ फोन : ४३०७८४१.

**क्र. १४/२००१ वधू** अश्विनी प्रकाश विद्वांस, कोकणस्थ, गोत्र-कपि, जन्म - २९.१.१९७७, उंची ४'-३ १/२'', एम्.बी.ए. (गुजरात युनि.), खाजगी कंपनीत नोकरी, चष्मा आहे, लेन्स लावते, प्रकृति निकोप, सडपातळ बांधा, ब्लड ग्रुप-बी पॉझिटिव्ह, **अपेक्षा** - इंजिनिअर, डॉक्टर, उच्चशिक्षित, मा. प्रा. रु. १०,००० चे वर, **संपर्क -** प्रकाश गणेश विद्वांस (पृ.६४५), 'शिवम', म्युनिसिपल स्कूल नं. ८ समोर, मणिआसा सोसायटी, मणिनगर (पूर्व), अहमदाबाद - ३८० ००८. फोन : २७७९११२.

**क्र. १५/२००१ वर** धनंजय गजानन मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, जन्म - ११.११.१९७५, निमगोरा, उंची ५'-१०'', सडपातळ, B+ve. SSC, ITI मेकॅनिकल ड्राप्समन, पिंपरी येथील टेल्कोमधे डाय डिझायनर,मा.प्रा.१२,०००/- मुलाला आई वडील, १ मोठा भाऊ विवाहित, १ लहान भाऊ नोकरी करतो, स्वत:चे घर आहे, गाण्याची आवड आहे, **अपेक्षा -** गोरी, १२वी किंवा पदवीधर, DME किंवा कँड, कॉम्प्युटर येत असल्यास उत्तम, शक्यतो कोकणस्थ, **संपर्क** - गजानन बाळकृष्ण मराठे, सन व्ह्यू, ८बी, स्वामी समर्थ मंदिरासमोर, वास्तु उद्योग जवळ, पिंपरी, पुणे ४११ ०१८, फोन : ७४८४९५३, ७४५९२१५. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १६/२००१ वर** श्रीराम गोपाळ नानजकर, देशस्थ, जन्म - २७.३.१९६९, गोत्र-जमदग्नी, उंची ५'-६'', B.Com., स्टँप व्हेंडर व STD बूथ, मा. प्रा. ५,०००/-, गहू वर्ण, सडपातळ, O+ve, मुलाला आई वडील व २ विवाहित बहीणी आहेत. **अपेक्षा -** B.Com.. नोकरी सरकारी किंवा बँकेत, **संपर्क -** गोपाळ बाळकृष्ण नानजकर, १३४, शनिवार पेठ, आपटे घाट, पुणे ३०, फोन : ४४६५८७८. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १७/२००१ वर** हर्षद मधुसूदन देवधर, कोब्रा, गोत्र-कौशिक, जन्म - ९.४.१९७१, उंची ५'-८'', S.S.C. व शॉर्ट कोर्सेस, मुलाचे स्वत:चे डेकोरेलचे दुकान असून विविध एजन्सी आहेत, मा. प्रा. ४ ते ५ हजार, मध्यम बांधा, गोरा वर्ण, मुलाला आई, वडील (स्टेट बँकेतील निवृत्त अधिकारी), १ विवाहित बहीण, स्वत:चा बंगला आहे, **अपेक्षा -** शक्यतो कोकणस्थ किंवा कऱ्हाडे, मुलाच्या आई वडीलांजवळ राहण्यास तयार असणारी, **संपर्क -** श्री. मधुसूदन सदाशिव, देवधर, 'उत्कर्ष' स्टेट बँक सोसायटी, बंगला नं. ३, न्यू आग्रा रोड, नाशिक १, फोन :९५२५३-५९६५३०(सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १८/२००१ वर** श्रीधर भानुदास ठाकूरदेसाई, कऱ्हाडे ब्राह्मण, गोत्र-कौशिक, जन्म - १६.२.१९७३, उंची ५'-४ १/२'', गोरा, मध्यम बांधा, B.Com., अरविंद मिल-कलोल गुजराथ येथे मशीन ऑपरेटर, मा. प्रा. ४,०००/-, मुलाला आई वडील व २ विवाहित भाऊ आहेत, **अपेक्षा -** १२वी, गोरी,गुजराथमधे राहण्यास तयार असलेली, कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेची, **संपर्क** - श्री. भानुदास गोपाळ ठाकूरदेसाई, ५६० दत्तवाडी, साईबाबा मंदिराजवळ, पुणे ३०, फोन : ४३३८७५५, (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. १९/२००१ वर** निवृत्ती अविनाश भिडे नित्युंदन गोत्र-कोब्रा, जन्म - २२.१०.१९७१, उंची ५'-१०'', BSL, LLB, LLM, स्वत:चे हॉटेल आहे. मा. प्रा. १०,०००/-, वर्ण गोरा, मजबूत बांधा, AB+ve, मुलाला आई, वडील, मोठी बहीण आहे, **अपेक्षा** - मिळून मिसळून वागणारी, सर्व कामात मदत करणारी, **संपर्क** - अविनाश पुरुषोत्तम भिडे, ५७५ नारायण, देवळे वाडा, पुणे - ४११ ०३०. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)

**क्र. २०/२००१ वर** प्रविण बाळकृष्ण साळवेकर, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, गोत्र-काश्यप, जन्म - ९.२.१९७०, उंची ५'-६'', B.Com., DCA, DTL, मंत्री हाऊसिंगमधे अकौंटंट, मा. प्रा. ७,०००/-, सडपातळ, गोरा, मुलाला आई वडील असून १ मोठा भाऊ व १ लहान बहीण विवाहित, **अपेक्षा** - पदवीधर, देशस्थ ऋग्वेदी, **संपर्क** - बाळकृष्ण गोविंद साळवेकर, रुम नं. १९, सुखसागर नगर भाग २, खंडोबा मंदिराजवळ, कात्रज, पुणे ४६, फोन : ६९६११६३, (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत)



Marathe Pratishthan

# चित्तपावन ब्राह्मण

**- संजय गोडबोले**, पुणे

चित्पावन ब्राह्मण ही दक्षिणी ब्राह्मणातील एक पोटजात. यांना चिपळूणे, कोकणस्थ अशा नावानेही संबोधिले जाते. रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण हे त्यांचे मूळ वसतिस्थान समजले जाते. चित्पावन या शब्दाच्या उत्पत्तीबाबत अनेकांनी मत प्रदर्शित केले आहे. श्री. मंडलिक यांच्या मते इजिप्त या शब्दापासून जित्पावन व नंतर त्याचे वर्णव्यत्यास होऊन चित्पावन हा शब्द बनला. श्री. गो. कृ. मोडक यांच्या मते क्षितीपावन या शब्दापासून चित्पावन हा शब्द बनला असावा. क्षिती म्हणजे जमीन. कोकणातील जमीन पूर्वी खारी होती. तेथील लोकांनी ती शेतीस योग्य केली. क्षिती जमिनीस पावन करणारे ते चित्तपावन

चित्पावन ब्राह्मण कोकणात कोठून आले याविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. ते समुद्रमार्गे आले असावे असे समजले जाते. स्कंद पुराणातील एका कथेवरून चौदा माणसे मरणोन्मुख स्थितीत भारताच्या किनाऱ्याला लागली. परशुरामाने त्यांना जीवन प्रदान केले ते चित्पावन झाले. चित्पावन ब्राह्मण परशुरामाला आपले कुलदैवत मानतात.

डॉ. इरावती कर्वे यांनी मराठी लोकांची संस्कृती हा ग्रंथ लिहिला यांच्या मते चित्पावन या नावावरून अती तर्क-वितर्क झाले आहेत. पण त्याचा अर्थ कोणाला कळला नाही. जातीला मोठेपणा देण्यासाठी काही जातींना विश्वकर्मा, चांद्रसेनीय वगैरे उपपदे आहेत. त्यापैकी हे उपपद असावे. कृष्ण यजुर्वेदी व आश्वलायन ऋग्वेदी असे त्यांच्यात पोटभेद आहेत. परंतु आपापसात रोटीबेटी व्यवहार होतात. ही जात बरीच जुनी असावी. मामाच्या मुलीशी लग्न करण्याचा यांच्यात प्रघात नाही.

लखनौचे डॉ. धीरेन्द्र मुजूमदार गुजरात यांनी मधील लोकांच्या वंशाचा शास्त्रीय अभ्यास केला होता. त्याच पध्दतीने डॉ. इरावती कर्वे यांनी डॉ. वि. म. दांडेकर यांच्या साह्याने महाराष्ट्रातील लोकांच्या शरीर वर्णनाचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यांच्या संशोधनाच्या आधारे चित्पावनांच्या डोक्याचा घेर ५४१.०५ मि.मी. सर्वसाधारणरित्या असतो. त्यांची उंची मध्यम - पाच फूट पाच इंच असते. व ते मोठ्या डोक्याचे व मध्यम कपाल वर्गाचे आहेत.

लिंडा कॉक ही अमेरिकेतील सार्थमूर कॉलेज, पेन्सिल्व्हानिसा येथील विदुषी. मराठीचा अभ्यास करण्यासाठी ती डेक्कन कॉलेज, पुणे येथे आली. लिंडा कॉकने कोकणस्थ ब्राह्मणांवर शोध ग्रंथ लिहिला आहे. लिंडा कॉक कोकणस्थ ब्राह्मणांचे वर्णन करताना म्हणते, 'गोरा रंग, घारे डोळे व सरळ नाक असणारा व देखणा महाराष्ट्रीयन ब्राह्मण तुम्हाला आढळला तर तो निश्चितच कोकणस्थ चित्पावन असला पाहिजे.' लिंडा कॉकच्या मते चित्पावनांचा विशिष्ट प्रकारचा वर्णच त्यांचा परकीय संबंध स्पष्ट करतो. चित्पावन ब्राह्मणांच्या वंशाविषयी ती म्हणते, बानी इस्त्रायली बरोबर जहाजातून चुकामूक झालेल्या या व्यक्ती असाव्यात अथवा ते ग्रीसहून आले असावे.

लिंडा कॉकने चित्पावनांवर एक प्रदीर्घ लेख इलस्ट्रेडेड वीकलीत प्रकाशित केला. तिच्या मते कोकणस्थ ब्राह्मण एक विचारध्येयाला वाहून घेतलेले असतात. कार्याला सर्वस्व अर्पित करून झोकून देऊन काम करण्याची यांच्यात प्रवृत्ती आढळते. चित्पावनांत संत झाले नाहीत. पण देशभक्त व स्वातंत्र्ययोध्दे फार झाले. सुधारक, सुधारणावादी चित्पावनांचे व्यवहारचातुर्य, स्वच्छता व टापटीप हे प्रमुख गुण आहेत असे लिंडा कॉकने प्रतिपादन केले आहे.

चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणात अनेक कर्तबगार पुरुष होऊन गेले. यात धोंडे केशव कर्वे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, सावरकर, न्या. रानडे, क्रांतीकारी चाफेकर, संगीत तज्ज्ञ भातखंडे, नाटककंपनीचे देवल, लोकहितवादी, धर्मशास्त्राचे तज्ज्ञ काणे, ज्ञानकोशकार केतकर, इतिहासाचार्य राजवाडे, न. चिं. केळकर, रँग्लर परांजपे इत्यादी चित्पावनांचा लिंडा कॉकने प्रामुख्याने उल्लेख केला आहे. पेशवाई बुडल्यानंतरच्या काळात अनेक चित्पावन युरोपियन अधिकाऱ्यांचा वध करण्याच्या प्रयत्नात होते. ब्रिटीश राज्यात यांनी पाश्चिमात्य शिक्षण घेऊन कायदा, संशोधन व विज्ञानाच्या क्षेत्रातही प्रवेश केला. बुद्धीची कामे करण्यांत आजही त्यांचे पाऊल पुढे असते. लोकसंख्येने कमी असून त्यामानाने या समाजातील व्यक्तींचे योगदान फार मोठे झाले आहे, असे लिंडा कॉकने म्हटले आहे.

सीताराम गायकवाड यांनी १८८६ साली 'पुणे शहराचे वर्णन' हा ग्रंथ लिहिला होता. यात चित्पावन - ब्राह्मणांवर स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. यात पुण्यात चित्पावनांची दहा हजार वस्ती असल्याचे नमूद केले आहे. श्रीवर्धनचा बाळाजी विश्वनाथ भट छत्रपतींचे मुख्य प्रधान झाल्यावर त्यांनी आपल्या चित्पावन जातीस नावारूपास आणले. चित्पावन देशावर येण्यापूर्वी मराठेशाहीत देशस्थ ब्राह्मणांचा चढता पाया होता. हे देशस्थ ब्राह्मण चित्पावनांना पंक्तीस घेत नसत. श्रीनिवास प्रतिनिधी यांच्या मुलाची मुंज कऱ्हाडपाशी कोळेगांवी झाली. त्यावेळी देशस्थ कोकणस्थ या जातीत समेट होऊन पंक्ती व्यवहाराचा पाया घातला. दफ्तरी कामात देशावर आल्यावर चित्पावनांनी बिवलकरी व जनोबा भट्टी अशी दोन हस्ताक्षरांची वळणे स्थापित केली. सीताराम गायकवाड म्हणतात, चित्पावन हे आपल्या बुद्धीने व श्रमाने इतर लोकांना मागे पाडत जाऊन हल्ली तर इंग्रजीचे अनुकरण करण्यात यांचे पाऊल पुढे आहे. चित्पावन पाहिजे तो धंदा करण्यास

---

(*विवाह सहाय्य* - मागील पानावरून)

**क्र. २१/२००१ वर** चिंतामणी अनिल मराठे, कोब्रा, गोत्र-कपि, M.Sc. Organic Chemistry, उंची ५'-९'', Hitech Drilling Servises & Tata Enterprises चेन्नई (मद्रास) येथे Production Manager, मा. प्रा. १५,०००/-, निमगोरा, मध्यम बांधा, A+ve. मुलाला आई आहे, वडील नाही, १ लहान भाऊ बँकेत नोकरी करतो. स्वत:चे वडीलोपार्जित घर आहे, तबला वाजवतो, **अपेक्षा** - पदवीधर, शक्यतो कोकणस्थ, मद्रास व राजगुरु नगर दोन्हीकडे राहण्यास तयार असलेली, देशस्थ ऋग्वेदी, **संपर्क** - श्रीमती नीला अनिल मराठे, २९० मोती चौक, राजगुरुनगर ४१० ५०५. फोन : ९५२१३५-२३४३६, (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८०, पुणे, यांचे मार्फत) ★★★



Marathe Pratishthan

## तरुणांसाठी लेखनस्पर्धा

हितगुजमधे तरुणांसाठी खास लेखनस्पर्धा घेण्यात यावी ही सूचना मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत घाटकोपर येथील सभासद (बंगाली आजोबा) श्री. गजानन भास्कर (पृ.४२७) यांनी केली होती. याबाबत कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे अशी स्पर्धा जाहीर करीत आहो.

१. ही स्पर्धा ४० वर्षे वयांपर्यंतच्या मराठे कुलबांधवांसाठी (माहेरवाशिणींसह) खुली आहे.

२. ही स्पर्धा निरनिराळ्या ४ गटांत विभागली आहे. ते गट व पारितोषिके खालीलप्रमाणे -
अ) कथा साहित्य - पारितोषिके रु. २०० व रु. १००
ब) प्रवासवर्णन - पारितोषिके रु. २०० व रु. १००
क) अनुभव, चिंतनात्मक लेखन - पारितोषिके रु. २०० व रु. १००
ड) कविता - पारितोषिके रु. १०० व रु. ६०

३. लिखाण कागदाच्या एकाच बाजूवर, पुरेसा समास सोडून सुवाच्य लिहिलेले असावे.

४. लिखाणावर स्वत:चे नाव-गाव इ. तपशील नसावा. त्यासाठी सोबत स्वतंत्र पत्र असावे. त्यात पुढील तपशील असावा.
अ) लेखकाचे पूर्ण नांव, पत्ता (पिनकोड सह) व फोन नंबर.
ब) लेखकाची जन्मतारीख
क) लिखाण कोणत्या गटांतल्या स्पर्धेसाठी पाठवले आहे त्याचा स्पष्ट निर्देश पत्रात असावा.
ड) लिखाण स्वतंत्र, अनुवादित - आधारित असल्यास तसा स्पष्ट उल्लेख असावा.

५. प्रत्येक गटात किमान ५ स्पर्धकांकडून लिखाण आले तरच त्या गटासाठी पारितोषिके देण्यात येतील.

६. साहित्य संपादक हितगुज यांचे नांव ३१ ऑगस्ट २००१ पर्यत पोचेल असे पाठवावे.

७. आवश्यकतेनुसार वरील नियमांत आयत्यावेळी वाढ अगर बदल करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.

८. लिखाणाचे मूल्यमापन कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या परीक्षकांमार्फत करण्यात येईल. त्यांचा निर्णय अंतिम राहील.

---

मागे पुढे पहात नाहीत. कोणी वैदिक, कोणी सावकार, तर कोणी व्यापारी. चित्पावनांसारखे कसून मेहनत करणारे, उद्योगी, साहसी व टापटिपीचे, पाहिजे ते करण्यास तयार असे लोक ह्या महाराष्ट्रात विरळेच आढळतील.

पुणे शहरात हरी भागवत यांनी १९२४ साली एक ग्रंथ लिहिला होता. यात 'पुणे शहरातील राजकीय, सामाजिक, बौद्धिक उलाढालींचे पुढारीपण चित्पावनांकडे आहे व कोकणस्थांनी पुण्यातल्या इतर लोकांच्यावर आपल्या स्वभावाची छाप बसवून सर्वांना पाणीदार केले' असे प्रतिपादन त्यांनी केले होते. गोविंद हरी फडके यांनी १९२८ साली 'माझी तीर्थयात्रा' हे प्रवास वर्णन ३ खंडात प्रसिद्ध केले. याच्या तृतीय खंडात चित्पावनाविषयी माहिती आढळते. यात ते म्हणतात देशस्थ म्हणजे केवळ धार्मिक, जुन्या वृत्तीचे साधेभोळे व कोकणस्थ म्हणजे धूर्त, तडफदार. हा जाती विशिष्ट फरक अद्याप दृष्टीस पडतो.

कोकणस्थ लोक कोकणच्या काटक हवेत राहिल्याने त्या हवेचा त्यांच्यावर परिणाम होऊन त्यांच्या बुद्धीला तीव्रता आली. रंगाच्या विशिष्टत्वाच्या दर्शकामुळे गोरे, घारे ही आडनावे व धंद्यामुळे देशमुख, देसाई, जोशी अशी आडनावाची प्रवृत्ती झाली.

चित्पावनांत चौदा गोत्राचे चौसष्ट ब्राह्मण निघाले. यातले साठे म्हणजे साठावे व साठ्ये म्हणजे एकसष्टावे होय. कोकणस्थातील अक्का, ताई ही नावे तसेच अडगुलं मडगुलं, सोन्याचं कडगुलं ह्या बडबडगीतावरून चित्पावनांचा कानडी लोकांशी जवळचा संबंध आला असावा असे विधान श्री. फडके यांनी केले आहे.

चित्पावनांचे आचार व परंपरा वैदिक धर्मावर आधारित आहेत. शैव असल्याने गुहागरचा वाडेश्वर हे त्यांचे कुलदैवत आहे. गणेश पूजा व नवरात्रातील महालक्ष्मीची पूजा हे कोकणस्थ ब्राह्मणांचे वैशिष्ट्य समजले जाते. चित्पावनांना त्यांची विशिष्ट उच्चारण असणारी बोली भाषा होती ती आज व्यवहारातून नाहीशी झाली आहे.

चित्पावनात चौदा गोत्रे आहेत. विवाहप्रयोग म्हणून एक उत्तर पेशवाईतील हस्तलिखित माझ्या संग्रहात आहे. त्यात चित्पावनांची १९८ उपनामे (आडनावे) दिली आहेत. वेदशास्त्रसंपन्न केळेकर यांनी प्रसिद्ध केलेल्या गोत्रावळीत तर ३५३ उपनावे दिलेली आहेत.

असे म्हटले जाते की कोकणस्थ ब्राह्मण पेशवाईत कर्तबगारीस चढले. त्यामुळे पेशवे काळात त्यांच्याविषयीचे असंख्य कागदपत्रातले उल्लेख सापडतात. पण त्यापूर्वीच्या काळातले फारसे संदर्भ पुरावे आढळत नाहीत. श्री. पां. वा. काणे यांना संवत १७१७ चा मूहूर्तमाला हा ग्रंथ मिळाला होता. हा ग्रंथ काशी येथे लिहिलेला असून त्यात ग्रंथाचा कर्ता रघुनाथ व त्याच्या काशीतील पूर्वजांचा उल्लेख सापडतो. या रघुनाथाचे घराणे चित्पावन असून अकबर काळापासून काशीस वास्तव्यास होते व मुघल बादशहाने त्यांचा सन्मान केला होता असे श्री. काणे यांनी प्रतिपादन केले होते.

इतिहासचार्य राजवाडे आपल्या चित्पावनावरील प्रदीर्घ निबंधात म्हणतात की अग्निचयनात पाचचित्ये करत त्यांनी पावन झालेले ते चित्पावन. चित्पावन ब्राह्मणांच्याविषयी राजवाडे यांना कोकणात महत्त्वाचे कागद मिळाले होते. पावसच्या शके १५२२ सालच्या जामीनपत्रात गणो पराणजपे व भानजी गणपूला या चित्पावन आडनावांचा उल्लेख त्यांना मिळाला. शके १४७० ला नरसोपंत काळे हा चिपळूणचा कुलकर्णी होता, हा संदर्भही जुन्या कागदात मिळाला. पावसच्या जोशी घराण्याकडे राजवाडे यांना अती जुने कागद मिळाले. त्यावरून हे घराणे शके १२४० मध्ये अस्तित्वात असले पाहिजे.असा त्यांचा कयास होता. शके १५५० च्या खरेदीखतात अभैंकर, सोवनी, देसाई या नावाचा उल्लेख आढळला.

Marathe Pratishthan

(*चित्पावन ब्राह्मण* - मागील पानावरून)

१९१४ साली चित्पावनांची लोकसंख्या १ लाख १० हजार होती. मुत्सदगिरीने व बुद्धीबळानेच केवळ ते देशावरील स्पर्धेत टिकून राहिले, असे राजवाडे यांनी म्हटले आहे. कोकणातील परिस्थिती, दुष्काळ यामुळे कोकणस्थ ब्राह्मणात कंजूषपणा हा दुर्गुण निर्माण झाला. याबरोबर कुरापतखोरपणा, कावेबाजपणा हा त्यांचा स्वभाव आहे. नात्यागोत्यांच्या बाबतीत तर एकाच पिढीत चित्पावन अलिप्त होतात. त्यामुळे नातीगोती, विस्तारित कुल यांचा घोळ त्यांच्यात नसतो. हक्क बजावण्यासाठी लढण्याचा तर एक प्रकारचा चिवटपणा त्यांच्यात आहे. स्थलांतर करून व्यवसायात फेरबदल करून चित्पावन ब्राह्मणांनी आपल्या प्रगतीचा मार्ग शोधला असे आजवरच्या इतिहासावरून निदर्शनास येते.
(गोडबोले कुलवृत्तांतातून साभार - प्रेषक : **कै. सुरेश सखाराम,** पृ. ३९९, मुंबई.)

## या अंकात


१. **सार्वजनिक गणेशोत्सव : कसा नसावा? कसा असावा?.** पृ.१

२. **स्मरण पूर्वजांचे : पहिले विमागणित-तज्ज्ञ ग.स. मराठे** .. पृ.३
वि. गो. कुलकर्णी

३. **गणेशोत्सवात राष्ट्र जागृति, धर्म जागृति, राष्ट्रसंघटन यावर भर हवा** पृ.४
डॉ. पांडुरंग रामचंद्र

४. **सार्वजनिक गणेशोत्सवांची संख्या मर्यादित असावी** .. पृ.५
सदानंद प्रभाकर विद्वांस

५. **संत्तराव्या वर्षी सायकलने ८० किलोमीटर**........... पृ.५
यशवंत लक्ष्मण

६. **गुजरात भूकंपग्रस्तांच्या मदतकार्यातला आमचाहि खारीचा वाटा..** पृ.६

७. **उद्योग प्रवर्तन : पेरा म्हणजे उगवेल** ................ पृ.७
विनायक केशव

८. **अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र** ................. पृ.८
प्रेषक : प्रमोद कृष्ण

९. **शिर सलामत, तो पगडी पचास!** ..................... पृ.९
अच्युत धोंडो खांबेटे

१०. **भूकंपापासूनचा बोध** ................................. पृ.९
गजानन भास्कर

११. **आयकर दात्यानो सावधान** ........................... पृ.११
गजानन चिंतामण

१२. **चित्पावन ब्राह्मण** ...................................... पृ.१४
संजय गोडबोले

१३. **तरुणांसाठी लेखनस्पर्धा** ........................... पृ.१५


याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.६), **विवाह सहाय्य** (पृ.१२,१३), आणि **खुषीपत्रे** (पृ.३,७,८) ही नेहमीची सदरे.

बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan

(*चित्पावन ब्राह्मण* - मागील पानावरून)

१९१४ साली चित्पावनांची लोकसंख्या १ लाख १० हजार होती. मुत्सदगिरीने व बुद्धीबळानेच केवळ ते देशावरील स्पर्धेत टिकून राहिले, असे राजवाडे यांनी म्हटले आहे. कोकणातील परिस्थिती, दुष्काळ यामुळे कोकणस्थ ब्राह्मणात कंजूषपणा हा दुर्गुण निर्माण झाला. याबरोबर कुरापतखोरपणा, कावेबाजपणा हा त्यांचा स्वभाव आहे. नात्यागोत्यांच्या बाबतीत तर एकाच पिढीत चित्पावन अलिप्त होतात. त्यामुळे नातीगोती, विस्तारित कुल यांचा घोळ त्यांच्यात नसतो. हक्क बजावण्यासाठी लढण्याचा तर एक प्रकारचा चिवटपणा त्यांच्यात आहे. स्थलांतर करून व्यवसायात फेरबदल करून चित्पावन ब्राह्मणांनी आपल्या प्रगतीचा मार्ग शोधला असे आजवरच्या इतिहासावरून निदर्शनास येते. (गोडबोले कुलवृत्तांतातून साभार - प्रेषक : **कै. सुरेश सखाराम,** पृ. ३९९, मुंबई.)

## या अंकात


१. **सार्वजनिक गणेशोत्सव : कसा नसावा? कसा असावा?.** पृ.१

२. **स्मरण पूर्वजांचे : पहिले विमागणित-तज्ज्ञ ग.स. मराठे** .. पृ.३
वि. गो. कुलकर्णी

३. **गणेशोत्सवात राष्ट्र जागृति, धर्म जागृति, राष्ट्रसंघटन यावर भर हवा** पृ.४
डॉ. पांडुरंग रामचंद्र

४. **सार्वजनिक गणेशोत्सवांची संख्या मर्यादित असावी** .. पृ.५
सदानंद प्रभाकर विद्वांस

५. **सत्तराव्या वर्षी सायकलने ८० किलोमीटर**........... पृ.५
यशवंत लक्ष्मण

६. **गुजरात भूकंपग्रस्तांच्या मदतकार्यातला आमचाहि खारीचा वाटा**.. पृ.६

७. **उद्योग प्रवर्तन : पेरा म्हणजे उगवेल** ................ पृ.७
विनायक केशव

८. **अब्राहम लिंकनचे हेडमास्तरांस पत्र** ................. पृ.८
प्रेषक : प्रमोद कृष्ण

९. **शिर सलामत, तो पगडी पचास!** .................... पृ.९
अच्युत धोंडो खांबेटे

१०. **भूकंपापासूनचा बोध** ................................ पृ.९
गजानन भास्कर

११. **आयकर दात्यानो सावधान** ........................ पृ.११
गजानन चिंतामण

१२. **चित्पावन ब्राह्मण** ................................. पृ.१४
संजय गोडबोले

१३. **तरुणांसाठी लेखनस्पर्धा** ........................... पृ.१५

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.६), **विवाह सहाय्य** (पृ.१२,१३), आणि **खुषीपत्रे** (पृ.३,७,८) ही नेहमीची सदरे.


बुक पोष्ट

प्रति

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan